दैनिक अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३१३ । गुरूवार २७ ऑगस्ट २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

# चार वर्षांनंतर कांदा उत्पादकांना दिलासा!

## उन्हाळी कांद्याचे ३० ते ३५ टक्के नुकसान; दक्षिणेकडील आवक लांबली, खरीप कांदाही नोव्हेंबरमध्ये

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** गेल्या चार वर्षांपासून उत्पादन खर्चाच्या तुलनेत अपेक्षित भाव न मिळाल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या कांदा उत्पादकांना यंदा काहीसा दिलासा मिळू लागला आहे. चांगल्या दर्जाच्या कांद्याला सध्या ४० ते ४५ रुपये किलोपर्यंत भाव मिळत असून, आगामी काळातही दर टिकून राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे केंद्र सरकारने ग्राहकांना दिलासा देण्याच्या नावाखाली निर्यातबंदी किंवा साठा मर्यादा लादून पुन्हा कांदा उत्पादकांचा बाजारभाव पाडू नये, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.



यंदा देशात कांद्याचे उत्पादन जवळपास गतवर्षीइतकेच असले तरी प्रत्यक्ष बाजारातील उपलब्ध कांद्यावर हवामानाचा मोठा परिणाम झाला आहे. उन्हाळी कांदा काढणीच्या काळात अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा फटका बसल्याने चाळीत साठवलेल्या कांद्यापैकी तब्बल ३० ते ३५ टक्के कांदा खराब झाला आहे. कांदा सडणे, कोंब फुटणे आणि वजनात घट होण्याचे प्रमाण वाढल्याने शेतकऱ्यांच्या साठ्यातील विक्रीयोग्य कांद्याचे प्रमाण घटले आहे. २०२४-२५ मध्ये देशात ३०७.६ लाख टन कांद्याचे उत्पादन झाले होते, तर २०२५-२६ मध्ये ३०७.३ लाख टन उत्पादन झाले. मात्र केवळ उत्पादनाचा आकडा पाहून बाजारातील उपलब्धता ठरवता येत नाही. यंदा हवामानामुळे उन्हाळी कांद्याच्या साठवणुकीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या चांगल्या कांद्याचे प्रमाण कमी झाले आहे.

देशातील एकूण कांदा उत्पादनात रब्बी अर्थात उन्हाळी कांद्याचा वाटा सुमारे ७५ टक्के आहे. त्यामुळे या कांद्याच्या साठवणुकीवरच पुढील काही महिन्यांचा बाजार मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतो. यंदा याच कांद्याचे नुकसान झाल्याने बाजारातील पुरवठ्यावर ताण निर्माण झाला आहे.महाराष्ट्रातील उन्हाळी कांद्याची आवक संपण्याच्या(पान ४ वर)

### निर्यातीत घट

२०२५-२६ मध्ये देशातून ६.१० लाख टन कांदा निर्यात झाला होता. २०२६-२७ मध्ये ही निर्यात ५.३० लाख टनांवर आली आहे. म्हणजेच निर्यातीत वाढ झाल्यामुळे देशांतर्गत बाजारात कांद्याची कमतरता निर्माण झाली आहे, असे चित्र नाही. उलट हवामानामुळे कांद्याचे नुकसान आणि बाजारातील उपलब्धतेवर झालेला परिणाम हे दरवाढीमागचे महत्त्वाचे कारण आहे.

### आता भाव पाडू नका

गेल्या चार वर्षांपासून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळाला नाही. उत्पादन खर्च, मजुरी, वाहतूक आणि साठवणुकीचा खर्च वाढत असताना अनेक वेळा कांदा कवडीमोल दराने विकावा लागला. आता चांगल्या कांद्याला ४० ते ४५ रुपये किलोपर्यंत भाव मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दोन पैसे मिळण्याची संधी निर्माण झाली आहे. सरकारने ग्राहकांच्या हिताच्या नावाखाली निर्यातबंदी किंवा साठा मर्यादा लागू करून पुन्हा शेतकऱ्यांचा बाजारभाव पाडू नये. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित योग्य आणि स्थिर भाव मिळणे गरजेचे आहे.

**–ॲड. अजित काळे,**
शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष

# नेपाळमध्ये निसर्गाचा कहर...



## तिबेट सीमेवरील भोटेकोशी नदीला अचानक महापूर; गावे, पूल, रस्ते अन् जलविद्युत प्रकल्प वाहून गेले; बिहारलाही पुराचा धोका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**काठमांडू/दिल्ली :** तिबेट सीमेवरून आलेल्या अचानक महापुराने नेपाळमध्ये बुधवारी अक्षरशः हाहाकार उडवला. रसुवा जिल्ह्यातील भोटेकोशी नदीने अचानक रौद्ररूप धारण केल्याने तिमुरे, स्याफ्रुबेसीसह अनेक भागांत मोठ्या प्रमाणात विध्वंस झाला. घरे, बाजारपेठा, वाहने, पूल आणि जलविद्युत प्रकल्प पाण्याच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेले. या आपत्तीत आतापर्यंत अनेकांचा मृत्यू झाला असून १०५ भारतीयांसह ३८४ पर्यटक व प्रवाशांचा ठावठिकाणा अद्याप स्पष्ट झालेला नाही. बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

**१०५ भारतीयांसह ३८४ जण बेपत्ता**

**अवघ्या काही मिनिटांत गावांचा विध्वंस**

बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास भोटेकोशी नदीच्या पाणीपातळीत अचानक प्रचंड वाढ झाली. तिबेटकडून आलेल्या पाण्याच्या लोंढ्याने रसुवा जिल्ह्यातील तिमुरे आणि स्याफ्रुबेसी परिसराला मोठा तडाखा दिला. नदीकाठची घरे, दुकाने, वाहने आणि विविध पायाभूत सुविधा पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्या. अनेक पूल उद्ध्वस्त झाले असून संपर्क व्यवस्था विस्कळीत झाली आहे.पुरामुळे बेट्रावती ते रसुवागढी या चीन सीमेपर्यंतच्या सुमारे ४२ किलोमीटर रस्त्याचे मोठे नुकसान झाले असून अनेक काँक्रिट पूलही वाहून गेले आहेत. त्यामुळे नेपाळ-चीन सीमेवरील महत्त्वाचा संपर्कमार्ग ठप्प झाला आहे.

महापुरामुळे पर्यटनासाठी नेपाळमध्ये गेलेल्या भारतीयांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे. नेपाळ पर्यटन मंडळाच्या प्राथमिक माहितीनुसार, ३८४ पर्यटक व प्रवाशांचा ठावठिकाणा अद्याप लागलेला नाही. (पान ४ वर)

### सुरक्षा दलाचे जवानही बेपत्ता

पुरात नेपाळ पोलीस आणि सशस्त्र पोलीस दलातील जवानही बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. प्राथमिक अहवालानुसार २६ नेपाळ पोलीस आणि सात सशस्त्र पोलीस दलाचे जवान बेपत्ता आहेत. तसेच रसुवा सीमाशुल्क कार्यालयातील काही कर्मचारीही संपर्काबाहेर आहेत. नेपाळ लष्कर, पोलीस आणि सशस्त्र पोलीस दलाच्या पथकांकडून शोधमोहीम सुरू आहे.

### बिहारपर्यंत धोक्याची चाहूल

भोटेकोशी नदी पुढे त्रिशुली नदीला मिळते आणि ही नदी पुढे भारतात गंडक नदीच्या प्रवाहाशी जोडली जाते. त्यामुळे नेपाळमधील महापुराचा परिणाम भारताच्या सीमावर्ती भागांवर होण्याची शक्यता आहे. बिहारमधील गंडक नदीकाठच्या भागांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून नदीकाठच्या नागरिकांना सावध राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# थकीत बिलांसाठी कंत्राटदाराची आत्महत्या

## ६० लाखांची शासकीय कामे केली; वर्षभरापूर्वी पत्र देऊनही दखल नाही; १० वेळा कार्यालयांचे उंबरठे झिजवले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** 'उद्योग-व्यवसायात महाराष्ट्र नंबर वन, अर्थव्यवस्थेची दिमाखात घोडदौड' असा सत्ताधाऱ्यांकडून दावा केला जात असतानाच शासकीय कामांची थकीत बिले न मिळाल्याने एका सरकारी कंत्राटदाराने टोकाचे पाऊल



उचलल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गजानन देवकाते असे या कंत्राटदाराचे नाव आहे. कामे पूर्ण करूनही वेळेत बिले मिळत नसल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या देवकाते यांनी अखेर जीवन संपविले.

देवकाते यांनी थकीत बिलांसाठी शासकीय कार्यालयात तब्बल दहा वेळा चकरा मारल्या. वर्षभरापूर्वी कार्यकारी अभियंत्यांना पत्र लिहून थकीत देयके तातडीने अदा करण्याची मागणीही त्यांनी केली होती. मात्र, त्यांच्या पत्राची दखल घेतली गेली नाही, असा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे नैराश्यातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे.

गजानन देवकाते यांनी २०२४-२५ आणि २०२५-२६ या आर्थिक (पान ४ वर)

### राज्यात ९० हजार कोटींची देणी थकीत

दरम्यान, राज्यातील विविध शासकीय विभागांकडील तब्बल ९० हजार कोटी रुपयांची देयके थकीत असल्याचा दावा कंत्राटदार संघटनांकडून करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, ग्रामीण विकास आणि आदिवासी विकास विभागातील अनेक कंत्राटदारांची बिले गेल्या दोन ते अडीच वर्षांपासून प्रलंबित असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. त्यामुळे कंत्राटदारांवर बँकांचे कर्ज, मजुरी, साहित्य पुरवठादारांची देणी आणि अन्य आर्थिक जबाबदाऱ्यांचा वाढता बोजा पडत आहे.




# कुख्यात गुन्हेगार लखनसह तिघांना गावठी कट्ट्यासह पकडले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** चांदबिबी महाल परिसरात गावठी कट्टे आणि जिवंत काडतुसे घेऊन दबा धरून बसलेल्या कुख्यात गुन्हेगार लखन उर्फ लक्ष्मण कासार यांचसह तिघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने मोठ्या सीताफिने जेरबंद केले.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, अहिल्यानगर पाथर्डी रस्त्यावर चांदबिबी महालाजवळ विनाक्रमांकाच्या पल्सर मोटरसायकल जवळ काही संशयित हत्यारांची विक्री करण्यासाठी उभे असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत समजली. त्या आधारे पोलिसांनी नियोजनबद्ध सापळा रचून कुख्यात गुन्हेगार लखन कासार सह तिघांना पाठलाग करून पकडले. लक्ष्मण उर्फ लखन बाबासाहेब कासार (रा. कासारवाडी, तालुका पाथर्डी), सचिन राजेंद्र खाडे (रा. अमानवस्ती, तीन खडी, ता. पाथर्डी) अनिकेत दिलीप पठारे (रा. धामोरी, ता. नेवासा) असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी त्यांच्याकडून दोन गावठी कट्टे, दोन जिवंत काडतुसे, तीन मोबाईल फोन, विनाक्रमांकाची पल्सर मोटरसायकल असा सुमारे २ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, उपनिरीक्षक अनंत (पान ४ वर)

# बोगस गुणपत्रिका रॅकेटचा पर्दाफाश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चंद्रपूर :** राज्यातील पेपरफुटीच्या घटनांवरुन सध्या राज्यभर संताप व्यक्त होत असून नुकतेच २२ मार्च रोजी घेण्यात आलेल्या एमपीएससी परीक्षेचाही पेपर फुटल्याचं आता सिद्ध झाला आहे. सरकारने ती परीक्षा रद्द केली असून नव्याने उमेदवारांना परीक्षा द्यावी लागणार आहे. याप्रकरणी, आत्तापर्यंत ६ आरोपींना अटक करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. एकीकडे प्रवेश परीक्षा, स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटीचा मुद्दा गाजत असताना दुसरीकडे चंद्रपुरात बोगस गुणपत्रिकेची घटना समोर आली आहे. विविध विद्यापीठाच्या बनावट गुणपत्रिका आणि पदवी रॅकेटचा चंद्रपुरात पर्दाफाश करण्यात आला असून एका आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे. या बोगस गुणपत्रिका प्रकरणातील मुख्य सूत्रधार फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

**चंद्रपुरात एकास अटक, अलिशान गाड्या मार्कलिस्ट जप्त**

शिक्षणाची पंढरी असलेल्या पुणे विद्यापीठातून बोगस पदवी प्रमाणपत्र देण्याबाबत पैशांची मागणी केल्याचा आरोप एका रिक्षाचालकाने केला होता. त्यानंतर, (पान ४ वर)













# शेवगाव नगरपरिषद प्रशासकाची बनावट स्वाक्षरी; चौघांवर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** नगर परिषदेच्या प्रशासकाची बनावट स्वाक्षरी करून खोटी कागदपत्रे दिल्याची खळबळ जनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शेवगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी विजय घाडगे यांनी दिलेल्या तक्रारीवरून शेवगाव पोलीस ठाण्यात नगर परिषदेच्या वसुली विभागातील तिघा कर्मचाऱ्यांसह एका फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रशासकाची बनावट सही केल्याचे प्रकरण घडल्याने चर्चेला उधाण आले असून प्रशासकांचे लक्ष नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. नगरपरिषद मुख्याधिकारी विजय घाडगे यांनी नगरपरिषदेच्या वसुली विभागातील तिघे कर्मचारी व एका फायनान्स कंपनीचा कर्मचारी यांच्या विरोधात बनावट स्वाक्षरी करणे तसेच परिषदेच्या शिक्यांचा बेकायदा वापर केल्याबाबत पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली आहे.या तक्रारीत म्हटले आहे की, महेशर मन्सूर कुरेशी (शेवगाव) यांनी २५ ऑगस्ट रोजी शेवगाव नगर परिषद कार्यालात त्यांच्या जमिनी संदर्भात काही कागदपत्रे सादर केली. त्यातील झोन दाखल्यावरील माझी स्वाक्षरी बनावट असल्याचे लक्षात आले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली. तर नगरपरिषद कार्यालयातीलच कर्मचाऱ्यांनी आपल्याला ही कागदपत्रे दिल्याचे महेश्वर (पान ४ वर)






# गूंज उठी तरुणाई !

भास्कर खंडागळे
अतिथी संपादक
संपर्क : 9890845551

जंतर-मंतर मैदानावरील 'कॉक्रोच जनता पार्टी'चे आंदोलन आणि त्यापाठोपाठ राहुल गांधी यांचा 'छात्रों की गूंज' कार्यक्रम यांनी देशाच्या राजकारणाला वेगळ्या वळणावर आणून ठेवले आहे. राहुल गांधी आणि अभिजित दिपके यांच्यावर कोणी कितीही टीका केली, तरी बदलत्या राजकारणाची दखल सत्ताधाऱ्यांना आणि राजकारण्यांना घ्यावीच लागणार, यात शंका नाही. तशी ती घेतल्याचे उत्तर प्रदेश, राजस्थान आणि महाराष्ट्र या भाजपशासित राज्यांतील ताज्या घडामोडींवरून दिसते.

गेल्या दशकात धर्म, मंदिर, भाषा, जात, राष्ट्रभक्ती व राष्ट्रद्रोह, जिहाद याभोवती देशातील राजकारण पिंगा घालत राहिले. सत्ताधारीही याच ध्रुवीकरणाच्या राजकारणात मग्न राहिले. या मग्नतेत मूलभूत प्रश्नांकडे मात्र दुर्लक्ष झाले. त्यात मोफत धान्य, फुकट प्रवास, 'लाडकी बहीण' योजना अशा रेवडी संस्कृतीला खतपाणी मिळाले. तिला राजकीय यशही मिळाल्याने रेवडी संस्कृतीचे उदात्तीकरण होणे स्वाभाविक होते. रेवडी संस्कृतीच्या राजकीय यशामुळे 'फुकट उधळा आणि सत्ता मिळवा' असा राजकीय मंत्र आणि फंडा रुजला. भविष्याचा विचार करता हा अत्यंत घातक ठरणारा आहे. याची चाहूल आता आर्थिक दुरवस्थेतून लागत आहे. रेवडी संस्कृतीमुळे राज्यांची अर्थव्यवस्थाच खिळखिळी करून टाकली आहे. निधीअभावी ठप्प झालेल्या अनेक योजना आणि रखडलेल्या विकासकामांतून त्याचे स्पष्ट संकेत मिळतात.

यापुढे मात्र सत्ताधाऱ्यांना मोठे धोरणात्मक बदल करावे लागतील. याचे कारण 'कॉक्रोच जनता पार्टी' आणि राहुल गांधी यांनी देशात ल राजकारणाचा अजेंडा बदलून टाकला आहे. आता जेन-जी म्हणजेच तरुणाई राजकारणाच्या केंद्रस्थानी आली आहे. यामुळे धर्म, जात, मंदिर-मशीद, जिहाद, नक्षलवाद हे केंद्रस्थानी असलेले, पण आता गुळगुळीत झालेले मुद्दे राजकीय वर्तुळाच्या परिघाबाहेर फेकले जात आहेत.

जे राहुल गांधी सत्ताधाऱ्यांच्या टिंगल-टवाळीचा विषय आणि अदखलपात्र होते, ते अचानक दखलपात्र झाले. यामुळेच पुण्यातील 'छात्रों की गूंज' कार्यक्रमाचे तातडीने अनुकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करावे लागले. नागपुरात मुख्यमंत्री फडणवीस यांनी विद्यार्थी संवाद कार्यक्रमाची लगबग केली. याची प्रेरणा 'छात्रों की गूंज' होती, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. यातून काय संदेश मिळतो, हे राजकीय जाणकार नक्कीच जाणतील.

राहुल गांधी यांनी भाजपची मोठी पंचाईत करून ठेवली आहे. 'पप्पू' म्हणून हिणवले जाणाऱ्या राहुल गांधी यांनी टीकाकारांची 'धरलं तर चावतंय आणि सोडलं तर पळतंय' अशी गत करून टाकली आहे. अर्थात, या बदलाचे श्रेय निखालसपणे जाते ते जंतर-मंतरवरील तरुणाईच्या आंदोलनाला!

या बदलाचे सद्य:स्थितीतील राजकारण पाहता स्वागतच करायला हवे. कारण हा बदल सकारात्मक असणार आहे. युवकांशी म्हणजेच देशाच्या भवितव्याशी निगडित शिक्षण, आरोग्य, पाणी, महिला सुरक्षा, रोजगार असे मूलभूत प्रश्न यापुढील काळात राजकारणाच्या केंद्रस्थानी असणार आहेत. यावर राजकारण्यांना बोलावे लागेल, चर्चा करावी लागेल आणि हे मूलभूत प्रश्न मार्गी लावावे लागतील, एवढे नक्की.

त्यामुळे राजकारण्यांना यापुढील काळात सावध राहावे लागेल. 'बोलाची कढी आणि बोलाचाच भात' यापुढे तरुणाईला पचणार नाही! कारण, आजचा युवक उच्चशिक्षित आहे. त्याच्याकडे फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर, इन्स्टाग्राम यांसारखी आधुनिक संवादमाध्यमे आहेत. महत्त्वाचे म्हणजे जेन-जी निर्भीड आहे, सजग आहे, सावध आहे. तरुणाई आता बोलती झाली आहे. ती केवळ बोलघेवडेपणा करणाऱ्यांची बोलती बंद करण्याची क्षमता राखून आहे.

तेव्हा राजकारण्यांना तरुणाईच्या हाका सत्तेच्या धुंदीतून, पदांच्या मस्तीतून आणि लोकानुनयाच्या व ध्रुवीकरणाच्या नशेतून बाहेर पडून ऐकाव्या लागतील. आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कधी नव्हे तो शिक्षणाचा मुद्दा चर्चेत आला आहे. 'कॉक्रोच जनता पार्टी'ने आपल्या शिक्षण क्षेत्राची दुरवस्था चव्हाट्यावर आणली. त्याची दखल घ्यावीच लागणार आहे. तशी ती घेतलीही जात आहे. त्यामुळेच उत्तर प्रदेशात ध्रुवीकरणाची पीछेहाट होऊन योगी आदित्यनाथ आता 'शिक्षणयोग' याबाबत बोलत आहेत, हा योगायोग नक्कीच नाही.

राजस्थान सरकारने शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी तातडीने बारा हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्र्यांना शालेय प्रश्नांत लक्ष घालण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार मंत्री जयकुमार गोरे, दादा भुसे आणि अतुल सावे जिल्हा परिषद शाळा, आश्रमशाळा यांचे प्रश्न सोडवायला सरसावले आहेत.

उच्चन्यायालयाच्यान्यायमूर्तींसह अनेक जण कुंभमेळ्याच्या आर्थिक तरतुदीवर भाष्य करून शिक्षण क्षेत्रासाठीही अशीच तरतूद करण्यावर जाहीरपणे बोलून भर देत आहेत. महाराष्ट्रातील अनेक शाळा बंद पडत आहेत. अनेक ठिकाणी शाळांना इमारती नाहीत. आहेत त्या इमारतींची दुरवस्था झाली आहे. शाळांना स्वच्छतागृहे, मैदाने, आधुनिक शैक्षणिक साधने नाहीत. याबाबतही आवाज उठत आहे. उत्तर प्रदेशात या प्रश्नासाठी मुले रस्त्यावर उतरली. या सगळ्या घडामोडींमधून वारे कोणत्या दिशेने वाहू लागले आहेत, याचा अंदाज राजकारण्यांनी घ्यावा. वाऱ्याची बदलती दिशा सत्ताधाऱ्यांना मानवणारी नसली, तरी तिची दखल घ्यावीच लागेल.

अशी दखल घेतली नाही, तर तो आत्मघात ठरेल. त्यामुळे राजकारणाचे स्वरूप व संदर्भ बदलत आहेत. या बदलाची गांभीर्याने दखल घेऊन राजकारण्यांना बदलावे लागेल. वाचाळपणाला आवर घालावा लागेल. सवंग व भडकावू वक्तव्ये टाळावी लागतील. शिवराळपणाला लगाम घालावा लागेल.

यापुढे तरुणाईला भावनिक मुद्द्यांत गुरफटवून राजकीय मतलब साधणे अवघड होणार आहे. कारण, भावनिक मुद्द्यांनी राजकारण्यांचे भले होते; पण आपले रोजीरोटीचे, उदरनिर्वाहाचे, रोजगाराचे आणि भवितव्याचे प्रश्न तसेच राहतात. उलट ते आणखी बिकट होतात, हे वास्तव तरुणाईला कळून चुकले आहे. तरुणाई आता जागृत होत आहे. आपल्या प्रश्नांवर सवाल उपस्थित करून जवाब मागू लागली आहे. यापुढचा काळ राजकारण्यांसाठी म्हणूनच आव्हानाचा आणि तितकाच कसोटीचा ठरणार आहे. कारण, एकूण मतदारसंख्येच्या साठ टक्के तरुणाई मतदार आहे, याचे भान राजकारण्यांना ठेवावेच लागेल. यासाठी धुंदीत असलेल्या राजकारण्यांनी मागे वळून इतिहासात डोकावून पाहावे. स्वातंत्र्यापूर्वी तरुणाईने ब्रिटिशांना जेरीस आणले. स्वातंत्र्यानंतर स्व. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी आंदोलन झाले. या आंदोलनाने राजकीय क्रांती घडवून आणली. ऐंशीच्या दशकात मंडल आयोगावरून तरुणाईने रान पेटवले आणि पुन्हा राजकीय परिवर्तन घडले. अण्णा हजारे यांच्या 'इंडिया अगेन्स्ट करप्शन' या रामलीला मैदानावरील आंदोलनाने देश ढवळून टाकला आणि राजकीय क्रांती झाली. राजकारणाचे संदर्भ बदलून टाकले. तरुणाईचा हा इतिहास पाहता जंतर-मंतर मैदानावरील आंदोलन किंवा 'छात्रों की गूंज' हलक्यात घेणे म्हणजे पायावर धोंडा घालून घेणे ठरेल. कारण, काहींना काही काळ फसविता येते; पण सर्वांना सर्वकाळ फसविता येत नाही. यातून राजकारण्यांना काही शहाणपण सुचले, तर भले होईल. कारण, 'गूंज उठी तरुणाई!'

# गुरुने घडवलेले शिष्य; आता पुरस्काराच्या व्यासपीठावर गुरु-शिष्यांचा एकत्र सन्मान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : पत्रकारिता क्षेत्रात गुरुने दिलेले संस्कार आणि शिष्याने आपल्या कर्तृत्वाने मिळवलेली ओळख याचा अनोखा संगम लवकरच शिर्डीत पाहायला मिळणार आहे. पत्रकारितेतील गुरुवर्य सुधाकरराव कराळे तथा 'अंकल' आणि त्यांचे शिष्य रफीक शेख व राजेंद्र उंडे या गुरु-शिष्य त्रिकुटाची इच्छापूर्ती प्रतिष्ठानच्या राज्यस्तरीय 'इच्छापूर्ती गौरव – आदर्श पत्रकारितारत्न' पुरस्कारासाठी एकाचवेळी निवड झाली आहे. गुरुने शिकविले, शिष्यांनी नाव कमावले; आता पुरस्कारही एकाच मंचावर! या वैशिष्ट्यामुळे या पुरस्काराची चर्चा पत्रकारिता क्षेत्रात रंगली आहे. गुरु आणि त्यांच्या शिष्यांचा एकाचवेळी सन्मान होण्याची ही बाब विशेष ठरत असून, पत्रकारितेतील पिढ्यांमधील ज्ञान, अनुभव आणि संस्कारांची परंपरा अधोरेखित करणारी ठरली आहे.

पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय, प्रेरणादायी व समाजोपयोगी कार्याची दखल घेत इच्छापूर्ती प्रतिष्ठानच्या निवड समितीने या तिघांची निवड केली आहे. समाजाच्या सर्वांगीण





विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान अनुकरणीय असून, त्यांच्या कार्यातून अनेकांना प्रेरणा मिळत असल्याचे प्रतिष्ठानच्या वतीने सांगण्यात आले.

याबाबतची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष ह.भ.प. संपतराव जाधव यांनी दिली. या निवडीबद्दल पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून गुरु-शिष्य त्रिकुटाचे अभिनंदन केले जात आहे.

हा पुरस्कार सोहळा रविवार, ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता शिर्डी येथील हॉटेल साईधन येथे होणार आहे. पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव कदम, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महंत उद्धवजी महाराज मंडलिक, अक्षयजी महाराज भोसले, ज्ञानेश्वर महाराज जवळेकर, पांडूरंगगिरीजी महाराज वावीकर, खा.भाऊसाहेब वाकचौरे, आ.प्राजक्त तनपूरे, आ. अक्षय कर्डीले, माजी. खा.सदाशिव लोखंडे, माजी. आ.भाऊसाहेब कांबळे, माजी.मंत्री बबनराव घोलप, माजी.आ.चंद्रशेखर कदम, शिवसेना जिल्हा प्रमुख दक्षिण बाबुशेठ टायरवाले, जिल्हा प्रमुख उत्त नितीन औताडे, कमलाकर कोते, सुरेशसेठ वाबळे, सिने अभिनेत्री सुनिता कोते, प्रतिक्षा आगळे, राजकीय व अध्यात्मिक क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. असे प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष गणेश भांड, सचिव दत्तात्रय गागरे यांच्यासह सर्व सदस्यांनी या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. एका गुरूचे दोन शिष्य... आणि तिघांचाही एकाचवेळी सन्मान! हा अनोखा क्षण पुरस्कार सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

# द्रोणा अकॅडमीत ग्रीन डे उत्साहात साजरा

## चिमुरड्यांच्या सहभागाने परिसर हिरवेगार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** :राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोक दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या 'द्रोणा अकॅडमी'मध्ये नुकताच 'ग्रीन डे' अत्यंत उत्साहात आणि दणक्यात साजरा करण्यात आला. निसर्गाची जोपासना आणि पर्यावरणाचे महत्त्व चिमुरड्या वयातच मुलांच्या मनावर बिंबवण्याच्या उद्देशाने आयोजित




केलेल्या या कार्यक्रमात प्री प्रायमरी विभागातील सर्व चिमुरड्या विद्यार्थ्यांनी हिरव्या रंगाचे आकर्षक आणि सुंदर पोशाख परिधान करून मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना हिरव्या रंगाचे महत्त्व, झाडे-वनस्पतींचे संगोपन आणि पर्यावरणाचे संरक्षण याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध हिरव्या रंगाच्या वस्तू, फळे व पालेभाज्यांची ओळख करून घेतली. तसेच, हिरव्या रंगाशी संबंधित विविध आकर्षक उपक्रम, बालगीते आणि मनोरंजक कृतींचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे लहान मुलांची चिमुकली भाषणे, जी उपस्थितांचे मन जिंकून घेणारी होती. या संपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना 'झाडे लावा, झाडे जगवा आणि पर्यावरण वाचवा' हा मोलाचा संदेश देण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्री प्रायमरी विभागातील सर्व शिक्षक व शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम तसेच शिक्षक व शिक्षिका वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री निरगुडे यांनी केले. अशा आनंददायी आणि प्रबोधनपर सोहळ्यामुळे साकुरी परिसरातील द्रोणा अकॅडमीचे वातावरण पूर्णपणे चैतन्यमय झाले होते.

# धनगरवाडीत सप्ताहाची इच्छा पूर्ण; सर्वसामान्य शेतकऱ्याने दिली १०१ पोती साखर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव:** श्रीक्षेत्र सरालाबेटाशी पिढ्यानपिढ्या जोडलेल्या धनगरवाडी गावातील केरू विठ्ठल रकटे ऊर्फ नाना या सर्वसामान्य शेतकऱ्याची गावात सप्ताह व्हावा, ही अनेक वर्षांची इच्छा अखेर पूर्ण झाली. १७९ वा योगीराज सद्गुरू गंगागिरी महाराज सप्ताह धनगरवाडीत आयोजित झाल्याने आनंदित झालेल्या रकटे यांनी या सप्ताहासाठी तब्बल १०१ पोती साखर देऊन आपली श्रद्धा व्यक्त केली. सद्गुरू नारायणगिरी महाराजांच्या काळापासून रकटे कुटुंब श्रीक्षेत्र सरालाबेटाशी जोडलेले आहे. सुमारे एक हजार लोकसंख्या असलेल्या धनगरवाडीत सप्ताह व्हावा, अशी केरू नाना यांची मनापासून इच्छा होती. मात्र गावातील कोरडवाहू शेती व मर्यादित आर्थिक परिस्थितीमुळे ही इच्छा पूर्ण होईल का, याबाबत त्यांना शंका होती. निळवंडे कालव्याचे पाणी धनगरवाडीपर्यंत पोहोचल्यानंतर गावातील शेती बागायती झाली.



ग्रामस्थांची सप्ताह घेण्याची मागणीही सातत्याने सुरू होती. महंत रामगिरी महाराज यांची भेट घेत ग्रामस्थांनी इच्छा व्यक्त केल्यानंतर त्यांनी सप्ताहासाठी नारळ दिला आणि गावकऱ्यांची इच्छा पूर्ण झाली.

सप्ताह होणार हे निश्चित झाल्यानंतर केरू नाना यांनी काहीतरी भरीव दान देण्याचा संकल्प केला. दोन वर्षांपासून त्यांनी त्यासाठी पैशांची जुळवाजुळव केली. पाच एकर शेती असलेल्या या शेतकऱ्याने वाढलेल्या साखरेच्या बाजारभावाची पर्वा न करता श्रद्धेने १०१ पोती साखर दिली. गुरुपौर्णिमेच्या सोहळ्यात त्यांनी या देणगीची घोषणा केली होती. त्यावेळी महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

सप्ताहाच्या सांगता सोहळ्यात साखर देणाऱ्या प्रमुख देणगीदारांच्या यादीत केरू रकटे यांचे नावही जाहीर करण्यात आले. त्यावेळी ते व्यासपीठाऐवजी भाविकांच्या गर्दीत बसले होते. नाव पुकारताच त्यांनी उभे राहून दोन्ही हात जोडत आनंद व्यक्त केला. त्यांच्या या निस्सीम श्रद्धेचे उपस्थित भाविकांनी कौतुक केले.

# पावसाची उघडीप; खरीप हंगाम धोक्यात

## आठ दिवसांत पाऊस न झाल्यास पिकांनाही फटका

**अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : - अहिल्यानगर जिल्ह्यात मागील सुमारे पंधरा दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली आहेत. सुरुवातीला झालेल्या समाधानकारक पावसामुळे जोमात वाढलेली मका, सोयाबीन आणि बाजरीची पिके आता ओलाव्याअभावी सुकू लागली आहेत. हाताशी आलेला घास निसर्गाच्या लहरीपणामुळे हिरावला जाण्याची भीती निर्माण झाल्याने शेतकरी पुन्हा एकदा चिंतेत सापडला आहे.



जिल्ह्याच्या बहुतांश भागात गेल्या दोन आठवड्यांपासून पावसाचा थेंबही पडलेला नसल्याने जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी झाला आहे. सोयाबीन सध्या शेंगा भरण्याच्या व दाणे पोसण्याच्या महत्त्वाच्या अवस्थेत आहे. मात्र, पुरेसा ओलावा नसल्याने झाडे माना टाकू लागली आहेत. मक्याचे पीकही पाण्याअभावी कोमेजत असून बाजरीलाही पावसाच्या खंडाचा मोठा फटका बसत आहे. पिकांच्या वाढीच्या आणि फुलोऱ्याच्या अवस्थेत पाणी न मिळाल्यास उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

पावसाच्या दीर्घ खंडामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. चाऱ्यासाठी घेतलेला मका करपू लागल्याने ऐन पावसाळ्यातच पशुधनाच्या खाद्याची चिंता वाढली आहे. चारा व पाण्याअभावी दुभत्या जनावरांवरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

हलक्या जमिनीतील पिकांना या पावसाच्या खंडाचा सर्वाधिक फटका बसला असून जड जमिनीतील पिके सध्या काही प्रमाणात तग धरून आहेत. कोमेजलेली पिके वाचवण्यासाठी शेतकरी स्प्रिंकलरद्वारे पाणी देण्याचे नियोजन करीत आहेत. मात्र, सर्वच शेतकऱ्यांकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध नसल्याने अडचणी कायम आहेत.

येत्या आठ दिवसांत पाऊस न झाल्यास जड जमिनीतील पिकांनाही मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने पिकांची पाहणी करून नुकसानीचा आढावा घ्यावा व आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. राहाता तालुका कृषी अधिकारी आबा भोरे यांनी सविस्तर पिकांची आकडेवारी घेऊन कोणती पिके धोक्यात आहेत, याचा आढावा लवकरच घेण्यात येईल, अशी माहिती दिली.

# पाईपलाईन खोदली; दुरुस्ती मात्र रखडली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : राहाता तालुक्यातील हनुमंतगाव येथील इंदिरानगर परिसरातील नागरिकांना गेल्या महिनाभरापासून पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी तब्बल तीन वर्षांपासून नळाला मैलामिश्रित पाणी येत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी वारंवार केल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत प्रशासनाने पाणीपुरवठ्याची पाईपलाईन शोधण्यासाठी खोदकाम केले; मात्र दुरुस्तीचे काम पूर्ण न करताच खोदकाम तसेच ठेवण्यात आल्याने नागरिकांची समस्या अधिकच गंभीर झाली आहे. इंदिरानगर परिसरात नळाला येणाऱ्या पाण्यात मैला मिसळत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. लहान मुले, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त करत ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे अनेकदा तक्रारी केल्या. त्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांनी पाईपलाईनचा शोध घेण्यासाठी काही ठिकाणी खोदकाम करून पाहणी केली. मात्र पाईपलाईनमधील बिघाड दूर करून नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. मैलामिश्रित पाण्याची समस्या दूर करण्यासाठी पाईपलाईन खोदण्यात आली; मात्र दुरुस्तीचे काम रखडल्याने मागील महिनाभरापासून इंदिरानगरमधील नळ कोरडे आहेत. त्यामुळे पिण्याचे तसेच दैनंदिन वापराचे पाणी मिळविण्यासाठी नागरिकांना दूरवर जावे लागत आहे. विशेषतः महिलांना पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत असून, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांच्या कुटुंबांचीही मोठी गैरसोय होत आहे. काही कुटुंबांना नातेवाईक किंवा परिसरातील इतर ठिकाणांहून पाणी आणावे लागत असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

पाईपलाईन दुरुस्तीबाबत ग्रामसेवक तसेच ग्रामपंचायत प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. प्रत्येक वेळी काम लवकरच पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन दिले जात असले तरी प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. पाईपलाईनसाठी करण्यात आलेले खोदकाम अद्याप पूर्ववत करण्यात आलेले नसल्याने नागरिकांना ये-जा करतानाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.

गेल्या तीन वर्षांपासून मैलामिश्रित पाणी आणि आता महिनाभरापासून पाणीच बंद, अशा दुहेरी संकटामुळे इंदिरानगरवासीयांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. पाणीपुरवठा यंत्रणेची तातडीने दुरुस्ती करून स्वच्छ व नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच मैलामिश्रित पाणीपुरवठा झालेल्या कालावधीची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी होत आहे.

गेल्या महिनाभरापासून पाणी नसताना ठोस कार्यवाही होत नसल्याने ग्रामस्थांचा संयम सुटू लागला आहे. पाईपलाईन दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करून इंदिरानगरचा पाणीपुरवठा सुरळीत न केल्यास ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात

### तीन वर्षांची पाणीपट्टी घेऊ नका!

इंदिरानगर परिसरात गेल्या तीन वर्षांपासून नळाला मैलामिश्रित पाणी येत असल्याच्या तक्रारी आहेत. तसेच मागील एक महिन्यापासून नळाला पाणीच मिळत नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे मैलामिश्रित पाणी मिळालेल्या तीन वर्षांच्या कालावधीची तसेच मागील महिन्याची पाणीपट्टी ग्रामपंचायतीने घेऊ नये, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा सुरू करण्याबरोबरच पाणीपट्टीबाबतही ग्रामपंचायतीने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी होत आहे.

# कारेगावच्या पटलावरील एक तेजस्वी तारा निखळला

## ॲड. पोपटराव बबनराव पटारे यांना श्रद्धांजली...

या भू मातेवर काही व्यक्ती जन्म घेतात परंतु आपल्या कार्यकर्तुत्वामुळे, व आपल्या विविध गुणांमुळे ते कायम स्मृतीत राहतात. त्याप्रमाणेच कारेगाव येथील स्व. ॲड पोपटराव बबनराव पा.पटारे यांचा जन्म शेतकरी कुटुंब असणाऱ्या स्व. बबनराव पांडुरंग पटारे व ग.भा. सुमनबाई बबनराव पटारे यांच्या पोटी झाला. बबनराव पटारे यांनी शेतीबरोबरच व्यवसायाला महत्त्व देऊन श्रीरामपूर मेनरोडवर फॅशन हाऊस नावाने वातानुकुलीत कापड दुकान सुरू केले. बबनराव प्रपंचिक व्यक्ती असल्याने आपल्या कौटुंबिक जबाबदारी व्यवस्थित सांभाळत आपला प्रपंच कष्टाने फुलवत होते. त्यांना पोपटराव, सुभाष, सुरेखा, सुजाता, शितल अशी दोन मुले व तीन मुली अशी अपत्ये झाली. व्यवहारिक ज्ञानामुळे कै बबनराव यांनी आपल्या मुलांना चांगले संस्कार व शिक्षण दिले. यामध्ये ज्येष्ठ चि. पोपटराव यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा कारेगाव, इ. ७ वी ते १० वी शिक्षण मॉडेल हायस्कूल श्रीरामपूर , कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण मॉडर्न हायस्कूल पुणे, बी.ए. डिग्री फर्ग्युसन कॉलेज पुणे, तसेच एल.एल.बी. आय. एल. एस. लॉ कॉलेज पुणे येथे उत्तम शिक्षण दिले. तसेच पोपटराव यांनी बी. ए.एल. एल. एल. बी. ,एल.एल.एम डिग्री पूर्ण करून श्रीरामपूर व औरंगाबाद हायकोर्ट येथे प्रॅक्टिस केली. त्याचबरोबर आपल्या पारंपरिक शेती व्यवसायाकडे ही त्यांनी लक्ष दिले. बबनराव पटारे यांची शेती व प्रपंच मोठा असल्याने त्यांच्या सर्व मुला मुलींच्या सोयरीकी चांगल्या प्रतिष्ठित मोठ्या कुटुंबीयांशी झाल्या. त्यामुळे त्यांचा नातेवाईकांचा गोतावळा मोठा झाला.

यामध्ये १९८६ साली लक्ष्मणराव फाटके यांची मोठी मुलगी व रामू आप्पा फाटके व मा.आमदार संभाजीराव फाटके यांची पुतणी शीलाताई यांच्याशी पोपटराव यांचा विवाह झाला. उच्च व उत्तम शिक्षण घेतल्याने पोपटरावांनी आपल्या वकीलकी व्यवसायामार्फत न्याय व विधी क्षेत्रात लवकरच चांगला नावलौकिक प्राप्त केला. पोपटराव यांचा मूळ पासून स्वभाव जिद्दी, चिकाटी असलेला प्रामाणिक व कडक शिस्तीचा होता. व त्यांच्या वागण्यात स्पष्टवक्तेपणा होता. त्यांची अभ्यासुवृत्ती व शेतीसह, प्रत्येक प्रश्नाची जाण असल्यामुळे, प्रामाणिकपणे मार्गदर्शन व सल्ले मिळत असल्याने गावातील अनेक गरजू, अडलेले व्यक्ती त्यांचे मार्गदर्शन घेत. व पोपटराव ही प्रामाणिकपणे त्या गरजू लोकांचे प्रश्न सोडवत. त्यामुळे पोपटराव हे त्या भागातील एक चालते फिरते विद्यापीठ होते.सामाजिक व विविध क्षेत्रातील ज्ञान असल्याने त्यांनी २९ सप्टेंबर २००३ रोजी कारेगाव प्रगत बागायतदार विविध कार्यकारी सेवा संस्था स्थापन केली अनेक वर्ष ते चेअरमन राहिले. त्या माध्यमातून त्यांनी कारेगाव परिसरातील शेतकऱ्यांना आर्थिक सक्षम करून स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत केली.

व्यवसाय बरोबर त्यांनी शेतीमध्ये नवनवीन प्रयोग केले , बटाटा, ऊस ,चिकू, पपई सारख्या फळबागा लावल्या त्यांना शेतीची अत्यंत आवड असल्याने त्यांनी मनापासून शेती केली. शेती विषयी त्यांनी आपल्या आसपासच्या शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली त्यामुळे आजूबाजूच्या लोकांना ही पोपटरावांच्या शेतीविषयक ज्ञानाचा फायदा झाला. त्याचप्रमाणे शेतीच्या रस्त्याच्या समस्या, बांधाच्या समस्या त्यांनी सोडविल्या. त्यामुळे पोपटराव एक प्रकारे कारेगाव व परिसरासाठी एक उत्तम मार्गदर्शक व्यक्तिमत्व होते. त्याचबरोबर त्यांचे कनिष्ठ बंधू सुभाष पटारे यांनी आपल्या बंधूंच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी शेतकरी संघटने मार्फत प्रामाणिक प्रयत्न केले. त्यामुळे त्यांना शेतकरी संघटनेच्या जिल्हाध्यक्ष पदाची ही जबाबदारी मिळाली होती. असे हे गावातील प्रगतशील आदर्श शेतकरी कुटुंब यांनी आपल्या कर्तुत्वावर एक वेगळी ओळख निर्माण केली. पोपटराव व त्यांच्या पत्नी शीला यांना श्वेता ,धनश्री व कु. शरयू अशा तीन मुली झाल्या. पोपटराव आपले सर्व नातेवाईक, पत्नी मुली, बहिणी, मेहुणे भाऊ ,भाऊजाई सर्वच कुटुंबीयांशी प्रेमाने वागत. ते कुटुंबाचे नव्हे तर पूर्ण गावाचे आधारस्तंभ होते.सर्व काही व्यवस्थित सुरू असताना अचानकपणे अल्पशा आजाराने पोपटराव यांची ज्योत मावळली. असे म्हणतात जो आवडेल सर्वांना तोचि आवडे देवाला या प्रकारे पोपटराव स्वर्गवासी झाले. परंतु त्यांच्यातील चांगल्या निर्मळ मनाचे गुण, व त्यांच्यातील मार्गदर्शक तत्वे त्यांच्या कुटुंबीयांना व गावाला नेहमी प्रेरणा देत राहतील. आज स्व.ॲड पोपटराव यांना दशक्रिया विधी निमित्त भावपूर्ण श्रद्धांजली

**शब्दांकन पत्रकार**
**श्री अर्जुन राऊत**
**(टाकळीभान)**

# शेतमोजणीवरून सासू-सुनेला मारहाण; विनयभंगाचा आरोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी:** शेतजमिनीच्या मोजणीच्या खुणा करण्यावरून झालेल्या वादातून सासू-सुनेला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. तसेच सुनेचा ब्लाऊज फाडून विनयभंग केल्याची धक्कादायक घटना राहुरी फॅक्टरी परिसरात २४ ऑगस्ट रोजी दुपारी साडेएकच्या सुमारास घडली.

याप्रकरणी ३७ वर्षीय महिलेने राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीच्या शेताची मोजणी सुरू असताना आरोपी तेथे आले. 'माझ्या जमिनीकडे मोजणीच्या खुणा करायच्या नाहीत, तुमच्या जागेत करा,' असे म्हणत त्यांनी फिर्यादी महिलेला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. यावेळी आरोपींनी महिलेचा ब्लाऊज फाडून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचा आरोप आहे.

घटना सुरू असताना महिलेची सासू व दीर सोडविण्यासाठी आले असता त्यांनाही लाकडी काठी व दगडाने मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्यानंतर आरोपींनी 'मोजणी करायची नाही. तुम्ही सामाईक रस्त्याने कसे वावरता, ते पाहून घेऊ,' असे म्हणत तक्रार केल्यास पुन्हा मारहाण करण्याची तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी राहुरी पोलिसांनी रामकिसन सोमनाथ धनवडे, अमोल राजेंद्र धनवडे, राजेंद्र सोमनाथ धनवडे, वैभव विष्णु धनवडे, अंकुश सिताराम धनवडे, अरुण सिताराम धनवडे, तेजस रामकिसन धनवडे आणि शुभम राजेंद्र धनवडे (सर्व रा. राहुरी फॅक्टरी, ता. राहुरी) या आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार प्रवीण बागुल करीत आहेत.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# कौशल्य, शिस्त व प्रामाणिकपणाच्या जोरावर 'साई आदर्श'ची घोडदौड

## महंत उद्धव महाराज मंडलिक ; २०० कोटींच्या ठेवींनिमित्त ठेवीदारांचा आभार सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** संघटन कौशल्य, शिस्त आणि प्रामाणिकपणा या गुणांच्या बळावर कोणतीही संस्था यशस्वी वाटचाल करू शकते. साई आदर्श परिवाराने विश्वासार्ह व पारदर्शक कारभाराच्या माध्यमातून केलेली प्रगती कौतुकास्पद असून संस्थेने अशीच उत्तरोत्तर प्रगती करावी, असे प्रतिपादन वरद विनायक सेवाधामचे ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक यांनी केले.

राहुरी येथील साई आदर्श मल्टीस्टेटने २०० कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा पार केल्याबद्दल मुख्य कार्यालयात आयोजित ठेवीदार आभार व आनंद सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, ठेवीदार, अधिकारी-कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

डॉ. तनपुरे कारखान्याचे चेअरमन अरुण तनपुरे म्हणाले की, १२ वर्षांच्या अथक परिश्रमातून साई आदर्शने २०० कोटींच्या ठेवींचा टप्पा गाठला आहे.




चेअरमन शिवाजीराव कपाळे यांच्या नेतृत्वाखाली परिवारातील सदस्य व कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. गेल्या तीन दिवसांत ठेवीदारांनी तब्बल ३ कोटी ७० लाख रुपयांच्या ठेवी ठेवून संस्थेवरील विश्वास व्यक्त केला आहे. संस्थेची वाटचाल अशीच सुरू राहिल्यास आगामी काळात ५०० कोटींचा टप्पाही गाठता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

माजी आमदार चंद्रशेखर कदम यांनी विश्वास, पारदर्शकता व सातत्यपूर्ण कामामुळे संस्थेने मोठी झेप घेतल्याचे सांगत शुभेच्छा दिल्या.

सुरुवातीस संगीता कपाळे यांनी स्वागत केले. शिवाजीराव कपाळे यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला.

यावेळी प्रेरणा उद्योग समूहाचे अध्यक्ष सुरेश वाबळे, शामराव निमसे, आबासाहेब वाळुंज, डॉ. तनपुरे कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर कोळसे, ज्ञानेश्वर पवार आदी उपस्थित होते.

प्रसंगी विष्णुपंत गीते, वेदांत कपाळे, दीपक त्रिभुवन, अविनाश साबरे, प्रकाश सोनी, किशोर कोबरणे, सुनील संचेती, योगप्रशिक्षक किशोर थोरात, प्रमिला गावडे, जगन्नाथ बोऱ्हाडे, अन्सार शेख, पारस नहार, इंद्रभान पेरणे, सुनील विश्वासराव, संदीप इरोळे,पांडुरंग बोचकर, रवींद्र छाजेड, दादा माने, सोन्याबापू जाधव, मच्छीन्द्र टेकाळे, रमेश महेंद्रू, मधुकर देवकर, गांडुळे पुंजाराम, कचरू डुकरे, अनिल कांगणे, नितीन डमाळे, योगेश जाधव, संस्थेचे मुख्य व्यवस्थापक सचिन खडके व साई आदर्श परिवार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापूसाहेब तनपुरे यांनी केले तर आभार वेदांत कपाळे यांनी मानले.

---

द•ख•ल

## ईद-ए-मिलादनिमित्त कुकाण्यात मिरवणूक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील कुकाणा येथे मोहंमद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली. ईद मिलादुन्नबी (झेंडा ईद) म्हणून बुधवार दि. २६ रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त कुकाणे येथील जमा मस्जिदी पासून झेंडा मिरवणुकीस प्रारंभ झाला. तर न्यामत शहावलीबाबा दर्गा येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली. मिरवणुकीत धर्मगुरू मौलाना समशाद पठाण मुस्लिम युवा नेते युनूस नालबंद, ज्येष्ठ कार्यकर्ते हमीद नालबंद, रसूल इनामदार, लालाभाई शेख, याकूब शेख, समीर पठाण, अलिम इनामदार, इम्रान शेख, फयाज तांबोळी व मुस्लिम बांधव सहभागी झाले होते.

झेंडा मिरवणुकीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पवार, पोलिस हवालदार शहाजी आंधळे, बाबासाहेब वाघमोडे, हरी धायतडक, अमोल डमाळे, शेळके, माजी सरपंच दौलत देशमुख, एकनाथ कावरे, अनिल गर्जे, कैलास म्हस्के, राहुल जावळे, सुनील पंडित, विलास लिपणे, सुभाष चौधरी यांनी स्वागत करून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.



## श्रेया डमाळे शिष्यवृत्ती जिल्हा गुणवत्ता यादीत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव :** नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या निकालात कोपरगाव येथील श्री शारदा इंग्लिश मीडियम शाळेची विद्यार्थिनी श्रेया आदिनाथ डमाळे हिने जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेतही तिने जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवून आपल्या गुणवत्तेची छाप पाडली होती. श्रेया हिने कोणत्याही शिकवणी वर्गाचे मार्गदर्शन न घेता केवळ स्वयंअध्ययन, मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर हे यश मिळविले आहे. तिच्या जिद्दीचे, आत्मविश्वासाचे आणि अभ्यासूपणाचे हे यशस्वी फलित मानले जात आहे.

श्रेया ही निकमार विद्यापीठ, पुणे येथे परीक्षा नियंत्रक म्हणून कार्यरत असलेले डॉ. आदिनाथ डमाळे आणि जिल्हा परिषद शिक्षिका सौ. वैशाली लोहे यांची कन्या आहे.

---

## श्रीरामपुरात पैगंबर जयंती उत्साह

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत मोहम्मद सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांचा जन्मदिन ईद-ए-मिलादुन्नबी शहरात अत्यंत उत्साहात व शांततेत



साजरा झाला. यानिमित्ताने काल सकाळी मुस्लिम बहुल वार्ड क्रमांक दोन,मिल्लत नगर,फातिमा कॉलनी व इतर परिसरातून पैगंबर जयंतीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. जामा मशिदीचे प्रमुख मौलाना अलहाज मोहम्मद इमदाद अली यांच्या नेतृत्वाखाली ही मिरवणूक संपूर्ण भागामध्ये फिरून जामा मशीद मध्ये परत आल्यानंतर दुपारी तिची सांगता झाली.या सांगता सभेत माजी नगराध्यक्ष राजश्रीताई ससाने,सिद्धार्थ मुरकुटे,नगरसेवक दिलीप नागरे,मुजफ्फर शेख, अंजूमभाई शेख,दिलीप नागरे,कलीम कुरेशी,शाहिद कुरेशी,फिरोज शाह,माजी नगरसेवक मुख्तार शहा, शहर पोलीस निरीक्षक विशाल खैरे, यांच्यासह सर्व पक्षांचे नेतेमंडळी, मुस्लिम समाजाचे सर्व प्रमुख नेते व कार्यकर्ते सहभागी झाले होते.मिरवणुकीमध्ये डीजेवर नात पठण करण्यात येत होते. मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले तसेच बैतुशिफा हॉस्पिटल येथे सलग चौथ्या वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.संयोजक डॉ.सलीम शेख यांनी स्वतः रक्तदान केले.

---

## दिपक साळवे यांची वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्यपदी नियुक्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी नगरपरिषदेच्या वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना करण्यात आली असून, या समितीमध्ये दिपक रामजी साळवे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियमाच्या अनुषंगाने ही समिती कार्यरत राहणार आहे.

राहुरी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा वृक्ष प्राधिकरण समितीच्या अध्यक्ष माननीय श्रीमती विद्या पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली समितीचे कामकाज चालणार आहे. समितीच्या उपाध्यक्ष पदी डॉ. सौ. उषाताई प्रसादराव तनपुरे यांची नियुक्ती असून, सदस्य म्हणून बबन कोंडीराम गुलदगड, आकाश बाबासाहेब येवले आणि दीपक रामजी साळवे यांचा समावेश आहे.



समितीचे सचिव तथा वृक्ष प्राधिकरण समिती वृक्ष अधिकारी म्हणून शंकर रामनाथ आगलावे काम पाहणार आहेत. वृक्ष प्राधिकरण समिती राहुरी नगरपरिषद अध्यक्ष श्रीमती विद्या पाटील - मुख्याधिकारी, गट-अ तथा अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण समिती उपाध्यक्ष डॉ. उषाताई प्रसादराव तनपुरे उपाध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य बबन कोंडीराम गुलदगड सदस्य आकाश बाबासाहेब येवले सदस्य दीपक रामजी साळवे सचिव तथा वृक्ष अधिकारी शंकर रामनाथ आगलावे - सचिव तथा वृक्ष प्राधिकरण समिती वृक्ष अधिकारी आदी पदाधिकारी या कमिटीचे काम पाहणार आहेत.

---

## झुलेलाल मंदिरातील चालिहो उत्सवाची मिरवणुकीने सांगता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : येथील झुलेलाल मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही चालिहो उत्सव भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. १६ जुलैपासून सुरू असलेल्या या धार्मिक उत्सवाची बुधवार, दि. २४ ऑगस्ट रोजी झुलेलाल वरुणदेव बहिराणा साहेब यांच्या भव्य मिरवणुकीने सांगता झाली. सांगता दिनी भजन, कीर्तन, प्रार्थना आणि सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी चार वाजता बाईक रॅली काढण्यात आली. सायंकाळी सहा वाजता झुलेलाल मंदिरापासून सजविलेल्या रथातून बहिराणा साहेबांच्या मिरवणुकीस सुरुवात झाली. गुरुनानक मार्केट, मेनरोड, अक्षय कॉर्नर मार्गे मिरवणूक नॉर्दन ब्रँच येथील नदीकाठावर पोहोचली. तेथे बहिराणा साहेबांचे विधिवत विसर्जन करण्यात आले.

मिरवणुकीत ढोल-ताशे व डीजेच्या तालावर भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विविध आकर्षक देखावे सादर करण्यात आले. शहरातील विविध ठिकाणी मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. यावेळी महिला व भाविकांची मोठी उपस्थिती होती.

मिरवणुकी दरम्यान आ. हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, माजी विधानपरिषद सदस्य डॉ. सुधीर तांबे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी दर्शन घेतले.झुलेलाल विकास मंडळ व उत्सव कमिटीच्या वतीने आयोजित उत्सवाला झुलेलाल महिला मंडळ, हेल्पिंग हँड ग्रुप तसेच विविध मान्यवरांचे सहकार्य लाभले. उत्सव यशस्वी करण्यासाठी विश्वस्त, उत्सव कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

## समता पतसंस्थेच्या वतीने जि प मुलींच्या शाळेला वॉटर फिल्टर युनिट भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** येथील समता पतसंस्थेच्या शाखेच्या वतीने नेवासा खुर्द जिल्हा परिषद मुलींच्या शाळेला गरज ओळखून वॉटर फिल्टर युनिट भेट देण्यात आले.सदरचे वॉटर फिल्टर युनिटचे समता पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन ओमप्रकाश उर्फ काका कोयटे यांच्या हस्ते उद्घाटन करून लोकार्पण करण्यात आले.

या प्रसंगी मुख्याध्यापिका सरस्वती लोंढे यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत करत प्रास्ताविक केले.वॉटर फिल्टर युनिटमुळे शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलींना स्वच्छ पाणी मिळणार असल्याने त्यांनी समता पतसंस्थेला धन्यवाद देत समाधान व्यक्त केले.

उपाध्यापक अरविंद घोडके यांनी वॉटर फिल्टर मशीन ३०० लिटर क्षमतेचे असल्याने मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाची बाब असल्याचे सांगत समता पतसंस्थेला धन्यवाद देत त्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले.शाळेने लोकसहभागातून पालकांच्या मदतीतून शाळा विकास निधीतून पाण्याची टाकी, प्लंबिंग आणि स्टेजवरील फरशी बसवून इतर किरकोळ दुरुस्ती कामे करण्यात आली असल्याचे सांगितले.




यावेळी झालेल्या लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी समता पतसंस्थेचे चेअरमन काका कोयटे यांनी मुलींच्या शाळेतील गरज ओळखून आम्ही हे युनिट येथे भेट दिले असून मुलींचे आरोग्य जपण्यासाठी वॉटर फिल्टर उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हा परिषद मुलींच्या शाळेतील शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने चेअरमन काका कोयटे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा वर्षाताई पठाडे, सदस्य इंजिनिअर श्यामभाऊ डोकडे, मुख्याध्यापक सरस्वती लोंढे, शिक्षक अरविंद घोडके, शिक्षिका प्रतिभा पालकर, सुनिता वने, शरद मचे, विठ्ठल कांगुणे, वैशाली कुलट, ज्योती बोरुडे, वर्षा जगताप यांच्यासह माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

---

## शेतात फवारणी करताना बिबट्याची झडप ; वनविभागाने लावला पिंजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव :** राहाता तालुक्यातील हनुमंतगाव परिसरात नदीकाठच्या शेतात कपाशी पिकावर फवारणी करणाऱ्या शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला केल्याची घटना घडली. मच्छिंद्र भाऊसाहेब जेजुरकर हे कपाशीवर औषध फवारणी करीत असताना जवळच्या उसातून अचानक बिबट्या बाहेर आला आणि त्यांच्यावर झडप घातली. जेजुरकर यांनी आरडाओरड केल्यानंतर शेजारील शेतकरी नाना जेजुरकर व संदीप दिघे यांनी घटनास्थळी धाव घेत बिबट्याला हुसकावून लावले. त्यामुळे जेजुरकर यांचा जीव थोडक्यात बचावला.

या घटनेनंतर परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या भागात यापूर्वी बिबट्याची मादी व तिच्या पिल्लांचा वावर असल्याची माहिती वनविभागाला देण्यात आल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. आता थेट शेतकऱ्यावर हल्ला झाल्याने चिंतेत आणखी भर पडली आहे.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी नदीकाठ व ऊस क्षेत्राजवळ पिंजरा लावण्यात आला असून, परिसरात गस्तही वाढविण्यात आली आहे.

बबट्याच्या दहशतीमुळे शेतमजूर शेतात जाण्यास घाबरत असल्याने शेतीची कामे खोळंबण्याची शक्यता आहे. बिबट्या जेरबंद होईपर्यंत वनविभागाने गस्त कायम ठेवावी व शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

---

## त्रिमूर्ती महाविद्यालयात नवागतांचे जल्लोषात स्वागत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी फ्रेशर पार्टीचे उत्साहात आयोजन करण्यात आले. नवागत विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन जीवनातील पहिल्या पावलाला आनंद आणि उत्साहाची जोड देणारा हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या उपाध्यक्ष ॲड. स्नेहल घाडगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे, वरिष्ठ महाविद्यालयाच्या समन्वयिका डॉ. अनुराधा गोरे, डॉ. संध्या भंगाळे यांच्यासह प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ॲड. स्नेहल घाडगे पाटील यांनी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करून संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्राचार्य डॉ. आरसुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना




महाविद्यालयीन जीवन केवळ अभ्यासापुरते मर्यादित नसून शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना आदी उपक्रमांत सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन केले. यावेळी प्रज्ञा धनवटे, विद्या दारुंटे व भक्ती राहाट यांनी मनोगत व्यक्त केले. फ्रेशर पार्टीत नृत्य, गायन, विनोदी सादरीकरणे आणि विविध मनोरंजनात्मक खेळांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. नवागत विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत आपली कला व कौशल्ये सादर केली. 'मिस्टर फ्रेशर' व 'मिस फ्रेशर' निवडीसाठी विविध फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले. विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपेक्षा हजारे व श्रावणी खाटीक यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

---

## स्वामी अरुणगिरी महाराजांच्या रसाळ वाणीने दाढ बुद्रुक भक्तिरसात न्हाले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** पवित्र श्रावण मासाचे औचित्य साधून दाढ बुद्रुक (ता. राहाता) येथे आयोजित 'हनुमंत अखंड हरीनाम सप्ताह' व 'भव्य नवनाथ महाराज कथा सोहळा' भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. वैकुंठवासी मुकुंददास महाराज यांच्या कृपाशीर्वादाने आणि वरद विनायक सेवाधामचे मठाधिपती महंत गुरुवर्य उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

सोहळ्याचे प्रमुख आकर्षण अडबंगनाथ देवस्थानचे मठाधिपती स्वामी गुरुवर्य अरुणगिरी महाराज यांचे रसाळ निरूपण ठरले. दररोज सायंकाळी ६.३० ते रात्री ९ वाजेपर्यंत नवनाथ कथेचे निरूपण करण्यात आले. त्यांच्या ओघवत्या वाणीतून सादर झालेली कथा



ऐकण्यासाठी दाढ बुद्रुकसह पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. महाराजांच्या आध्यात्मिक विचारांनी आणि सुश्राव्य निरूपणाने श्रोते मंत्रमुग्ध झाले.

सोमवारी रात्री महंत गुरुवर्य उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांनी सोहळ्यास सदिच्छा भेट देऊन भाविकांना आध्यात्मिक मार्गदर्शन केले. कथेच्या सांगतेनंतर श्रावणी सोमवार व एकादशीचा योग साधून भाविकांसाठी खिचडी व झिरके या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

यावेळी डॉ. विखे पाटील कारखान्याचे संचालक गोरक्षनाथ तांबे यांनी लोकनेते बाळासाहेब विखे पाटील यांच्या सर्वधर्मसमभावाच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले. पावसामुळे कथेच्या प्रांगणात चिखल होत असल्याने भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मदतीने तातडीने पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात आले. याबद्दल तांबे यांनी ग्रामस्थांच्या वतीने आभार मानले.सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ, महिला मंडळ, तरुण मित्र मंडळ व विविध संघटनांनी परिश्रम घेतले.

---

## धनंजय जाधव यांची पिंपरी-चिंचवड येथे सहायक पोलीस आयुक्तपदी नियुक्ती

### राहुरीतील दमदार कार्यशैलीची दखल

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक म्हणून कर्तव्य बजावताना शिस्तबद्ध कारभार आणि गुन्हेगारीविरोधातील कठोर भूमिकेमुळे ठसा उमटविणारे धनंजय जाधव यांची पदोन्नती होऊन पिंपरी-चिंचवड येथे सहायक पोलीस आयुक्त (ACP) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल पोलीस दलासह विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे. धनंजय जाधव यांनी पंढरपूर येथे पोलीस निरीक्षक म्हणून सेवा बजावल्यानंतर राहुरी पोलीस ठाण्याची जबाबदारी सांभाळली. राहुरीतील कार्यकाळात त्यांनी गुन्हेगारीला आळा घालण्यासोबतच अवैध व्यवसायांवर कारवाई, वाहतूक शिस्त आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याला प्राधान्य दिले. विविध गुन्ह्यांचा तपास, गुन्हेगारांवर कारवाई आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी राबविलेल्या उपाययोजनांमुळे त्यांच्या कार्यशैलीची चर्चा झाली.

राहुरीनंतर त्यांनी नेवासा पोलीस ठाणे तसेच अहिल्यानगर येथील विशेष शाखेत पोलीस निरीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. तपासकौशल्य, प्रशासकीय शिस्त आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी यामुळे त्यांनी वरिष्ठांचा विश्वास संपादन केला.



त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना पोलीस उपअधीक्षक तथा सहायक पोलीस आयुक्त पदावर पदोन्नती देण्यात आली. पदोन्नतीनंतर त्यांनी सुमारे दोन महिने गडचिरोली येथे पोलीस उपअधीक्षक म्हणून सेवा बजावली. त्यानंतर मंगळवारी जारी झालेल्या नियुक्ती आदेशानुसार त्यांची पिंपरी-चिंचवड येथे सहायक पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती झाली आहे. मोठ्या पोलीस आयुक्तालयात मिळालेली ही जबाबदारी त्यांच्या आजवरच्या कार्याची दखल मानली जात आहे. राहुरीतील त्यांच्या कार्यकाळाची आठवण नागरिकांकडून आजही केली जाते. नव्या जबाबदारीतही ते प्रभावी कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त होत आहे.

---

## अमृतवाहिनी सहकारी बँकेला खडज ९००१ : २०१५ मानांकन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लिमिटेडला आंतरराष्ट्रीय दर्जाचे खडज ९००१:२०१५ मानांकन प्राप्त झाले आहे. बँकेच्या कॉर्पोरेट ट्रेनिंग हॉलच्या उद्घाटनप्रसंगी मानांकनाचे प्रमाणपत्र माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते बँकेकडे सुपूर्द करण्यात आले.

यावेळी बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले की, बँकेने गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. खडज ९००१:२०१५ हे आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त



गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीचे मानक असून, ग्राहकाभिमुख सेवा, कार्यपद्धतींचे प्रमाणीकरण, अंतर्गत नियंत्रण, जोखीम व्यवस्थापन आणि सातत्यपूर्ण सुधारणांबाबत बँकेची बांधिलकी यातून अधोरेखित होते. ग्रामीण भागातील ग्राहकांना आधुनिक व जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बँक करीत असलेल्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले.

बँकेचे अध्यक्ष सुधाकर जोशी यांनी हे मानांकन संचालक मंडळ, व्यवस्थापन आणि कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित असल्याचे सांगितले. यामुळे सभासद, ठेवीदार व ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ होईल, असे त्यांनी नमूद केले. मानांकनानंतर ग्राहक सेवा, तक्रार निवारण यंत्रणा आणि कार्यपद्धती अधिक सक्षम करण्यात येणार असून, वार्षिक अंतर्गत लेखापरीक्षण व सर्विलियनस ऑडिट नियमितपणे केले जाणार असल्याचे सांगण्यात आले.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुजराथी यांनी रिझर्व्ह बँकेच्या विविध परिपत्रकांचा अभ्यास करून बँकेच्या कार्यपद्धती नियामक मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत ठेवण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच डी पी डी पी ऍक्ट २०२३ बाबतही माहिती दिली.

खडज मानांकनासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून नेतृत्व करणारे कर्मचारी अमोल घुले व विवेक सोनवणे यांचा बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

व्हाईस चेअरमन ॲड. नानासाहेब शिंदे यांनी धांदरफळ व इगतपुरी तालुक्यातील साकूर येथे लवकरच दोन नवीन शाखा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती दिली. तसेच कर्मचाऱ्यांसाठी शैक्षणिक कर्ज सुविधा व रूफ-टॉप सोलर योजना सुरू केल्याचे सांगितले.

यावेळी संचालक मंडळ, अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांचे पदाधिकारी, बँकेचे ग्राहक व कर्मचारी उपस्थित होते.

---

## हलकी जमीन व कमी पाण्यामध्ये दिघी शिवारात बहारदार बाजरीचे पीक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील दिघी शिवारात पोपटराव पाठक यांच्या शेतावर हलक्या जमिनीत व कमी पाण्यामध्ये बाजरीचे अत्यंत बहारदार पिक आले आहे. तेलंगणा मधील धान्या सीड कंपनीने नवीन सहा जातीचे संकरित बियाणे प्रात्यक्षिक प्लॉट नजीक चिंचोली चे माजी सरपंच पोपटराव पाठक यांच्या शेतावर घेतले आहे. या पिकाची पाहणी कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे , महाराष्ट्र शासनाच्या कृषी खात्याचे मंडल कृषी अधिकारी लक्ष्मण सुडके व नजीक चिंचोलीचे बियाणे



तज्ञ अधिकारी सुभाष पाठक यांनी केली. या बाजरीच्या जातीपासून धान्य उत्पादन सरासरी दहा क्विंटल एकरी मिळेल शिवाय या बाजरीच्या ताटाची उंची सरासरी आठ ते नऊ फूट असल्यामुळे चाराही भरपूर मिळेल विशेषतः या बाजरीच्या पिकाची वाढ उत्कृष्ट असून पानांची रुंदी चांगली असल्यामुळे चारा गुणवत्ता चांगली राहील. गोंडेगाव चौफुलीवर हा प्रयोग घेण्यात आला आहे जमीन मुरमाड व हलकी असली तरी तसेच अत्यंत कमी पाण्यावर बाजरी पिकाची वाढ जोमदार आहे.

एल निनो प्रतिकूल परिस्थितीत डॉ. ढगे यांनी तुर व बाजरी पिके घ्यावीत असा सल्ला दिला होता. आज सर्वत्र पावसाचा मोठा खंड पडला आहे, मात्र बाजरी पिकावर त्याचा परिणाम दिसून आला नाही कारण पाण्याचा ताण सहन करण्याची शक्ती या नवीन संकरित वाणामध्ये आहे. नजीक चिंचोलीचे माजी सरपंच पोपटराव पाठक यांनी आभार व्यक्त केले.

# पान १ वरुन

## थकीत बिलांसाठी कंत्राटदाराची आत्महत्या

वर्षांत पाटबंधारे विभागाची सुमारे ६० लाख रुपयांची कामे केली होती. कामे पूर्ण केल्यानंतर आपल्या कष्टाचे पैसे मिळावेत, यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. मुख्य अभियंत्यांसह संबंधित कार्यालयांकडे पत्रव्यवहार करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. थकीत बिलांसाठी वारंवार कार्यालयांचे उंबरठे झिजवूनही देयके मिळत नसल्याने त्यांची आर्थिक कोंडी झाली होती. थकीत देयकांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य शासकीय कंत्राटदार फेडरेशन' आणि 'महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ' यांच्या नेतृत्वाखाली १८ आणि १९ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला विरोधी पक्षांनीही पाठिंबा दिला होता. थकीत बिले तातडीने अदा करण्याच्या मागणीसाठी आंदोलकांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. प्रत्येक शासकीय विभागाने आपल्या विभागाकडील थकीत बिलांचा आढावा घेऊन ती अदा करण्यासाठी निश्चित कालमर्यादेचे वेळापत्रक तयार करावे आणि ते सार्वजनिक करावे, अशी मागणी कंत्राटदार संघटनांनी केली आहे. मात्र, या प्रश्नावर अद्याप ठोस तोडगा निघालेला नसल्याने कंत्राटदारांमधील अस्वस्थता कायम आहे.

## नेपाळमध्ये निसर्गाचा कहर...

त्यात २९१ विदेशी आणि ९३ नेपाळी नागरिकांचा समावेश आहे. यामध्ये १०५ भारतीय नागरिक असल्याचे समोर आले आहे. ही प्राथमिक यादी असून प्रवासी संस्था, स्थानिक प्रशासन, मार्गदर्शक आणि सुरक्षा यंत्रणांच्या मदतीने माहितीची पडताळणी सुरू आहे. यातील अनेक प्रवासी तिबेटमधील कैलास-मानसरोवर यात्रेसाठी किंवा अन्य पर्यटनासाठी या मार्गावरून प्रवास करत असल्याचे वृत्त आहे. त्यामुळे भारतातील अनेक कुटुंबीयांची चिंता वाढली आहे. या महापुरामागील नेमके कारण अद्याप अधिकृतरीत्या स्पष्ट झालेले नाही. मात्र प्राथमिक वैज्ञानिक अंदाजानुसार, नेपाळच्या बाजूला ल्हेंडे नदीत बर्फाचा मोठा हिमस्खलनाचा ढिगारा पडून नदीचा प्रवाह काही काळ अडविला गेला असावा. त्यामुळे पाणी साचून अचानक अडथळा फुटल्यानंतर त्याचा प्रचंड लोंढा भोटेकोशी नदीत आला असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. याच सुमारास तिबेटमध्ये ४.४ तीव्रतेचा भूकंप झाल्याची नोंद अमेरिकेच्या भूगर्भीय सर्वेक्षण संस्थेने केली आहे. भूकंप आणि महापुराचा थेट संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे. ग्लेशियल लेक फुटल्याची शक्यताही तपासली जात आहे. महापुराच्या तडाख्यात रसुवा जिल्ह्यातील जलविद्युत प्रकल्पांना मोठा फटका बसला आहे. काही प्रकल्पांचे भाग पाण्याबरोबर वाहून गेले असून वीज निर्मिती क्षमतेवरही परिणाम झाला आहे. प्रारंभिक माहितीनुसार शेकडो मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांना या आपत्तीचा फटका बसला आहे. तिमुरे भागात बचावासाठी पाठविण्यात आलेल्या हेलिकॉप्टरलाही अडचणींचा सामना करावा लागला. पुराच्या पाण्याने हेलिपॅडच वाहून गेल्याने हेलिकॉप्टरला तेथे उतरता आले नाही. त्यामुळे दुर्गम भागातील बचावकार्य अधिक कठीण झाले आहे. ल्हेंडे नदीच्या वरच्या भागात अद्याप पाण्याचा अडथळा कायम असल्याची शक्यता असल्याने आणखी एक मोठा पुराचा लोंढा येण्याचा धोका व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे त्रिशुली नदीकाठच्या नुवाकोट, धादिंग आणि पुढील भागातील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नेपाळ सरकारने बचाव व मदतकार्यासाठी लष्कर आणि सुरक्षा यंत्रणांना तैनात केले आहे. दरम्यान, मृतांचा आणि बेपत्ता नागरिकांचा आकडा सतत बदलत असून बचावकार्य सुरू असल्याने अंतिम हानी अद्याप स्पष्ट झालेली नाही. त्यामुळे प्राथमिक आकडेवारीत विसंगती दिसत आहे.

## शेवगाव नगरपरिषद प्रशासकाची बनावट स्वाक्षरी; चौघांवर गुन्हा

कुरेशी यांनी सांगितले. अंतर्गत चौकशी अंती नगरपालिकेचे कर्मचारी तुराब अलीशौकतअली सय्यद (रा.पैठण), हबीब सुन्नामामु शेख (नाईकवाडी मोहल्ला, शेवगांव) आणि ज्ञानेश्वर प्रल्हाद भारस्कर (रा. साठेनगर, पैठण रोड) यांनी झोन दाखल्यासहित इतर कागदपत्रे ९ हजारात महेशर कुरेशी यांना दिल्याचे निष्पन्न झाले. त्यांना हे शिक्के देऊन त्यांची फसवणूक व दिशाभूल करून खोटी स्वाक्षरी व नगर परिषद शिक्के वापरून सदर बनावट कागदपत्रे तयार केली असल्याचे निष्पन्न झाले आहे. तिघा कर्मचाऱ्यांसह फायनान्स कंपनीचा कर्मचारी समीर शहा यांच्या विरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास शेवगाव पोलीस करत आहेत.

## कुख्यात गुन्हेगार लखनसह तिघांना गावठी कट्ट्यासह पकडले

शालगुडे, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, बाळासाहेब नागरगोजे, फुरकान शेख ,रिचर्ड गायकवाड, विशाल तनपुरे ,सागर ससाने, प्रशांत राठोड, महादेव भांड यांच्या पथकाने केली. याबाबत नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## बोगस गुणपत्रिका रॅकेटचा पर्दाफाश

हे प्रकरण चांगलेच गाजलं. त्यावर, विद्यापीठाने माहितीही दिली. आता, पुन्हा एकदा शिक्षण क्षेत्राला हादरविणाऱ्या एका मार्कशीट आणि पदवी रॅकेटचा पर्दाफाश चंद्रपूरच्या दुर्गापूर पोलिसांनी केला आहे. या प्रकरणी वैभव सोनूले नामक एका आरोपीस अटक करण्यात आली असून रॅकेटचा मुख्य सूत्रधार मात्र फरार आहे. मुख्य सूत्रधार मूळ चंद्रपूरचा असून सध्या राज्याच्या विविध भागात वास्तव्याला असल्याची प्राथमिक माहिती पुढे आली आहे.

पोलिसांनी या आरोपींकडून २ आलिशान वाहने जप्त केली आहेत. आरोपींनी लाभार्थ्यांकडून प्रत्येक गुणपत्रिका आणि पदवी यासाठी ५ ते १० लाख रु. घेतले जात होते, अशी माहिती समोर आली आहे. पोलीस तपास सध्या प्राथमिक अवस्थेत असून आरोपींची एकूण मोडस ऑपरेंडी आणि व्याप्ती लक्षात घेता अनेक धक्कादायक बाबी उजेडात येण्याची शक्यता असल्याचे दुर्गापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, संतोष शेवगावकर यांनी म्हटले. आधीच नोकरीत असलेल्या आणि बढतीसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांनी देखील या आरोपींकडून सर्वाधिक उच्च पदव्या मिळविल्या असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे, या घटनेने शैक्षणिक आणि प्रशासकीय नोकर वर्तुळ मात्र हादरले आहे.

## चार वर्षांनंतर कांदा उत्पादकांना दिलासा!

टप्प्यात असताना आंध्र प्रदेश आणि कर्नाटकातील कांदा साधारण ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये बाजारात येतो. हा कांदा पुढील सुमारे दोन महिने देशाची गरज भागवतो. मात्र यंदा मोसमी पाऊस उशिरा सक्रिय झाला असून पर्जन्यमानातही घट झाली आहे. त्यामुळे दक्षिणेकडील कांद्याची आवक अद्याप अपेक्षित प्रमाणात सुरू झालेली नाही.

यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः अहिल्यानगर आणि नाशिक परिसरातील साठवलेल्या कांद्याला सध्या चांगली मागणी मिळत आहे. शेतकऱ्यांच्या हातातील दर्जेदार कांदा बाजारात येत असल्याने त्याला समाधानकारक भाव मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महाराष्ट्रासह राजस्थानमधील अलवर आणि गुजरातमधील खरीप कांदा साधारण ऑक्टोबरअखेरपासून बाजारात येतो. मात्र यंदा पाऊस सुमारे महिनाभर उशिराने सक्रिय झाल्याने खरीप कांद्याची लागवडही उशिराने झाली. त्यामुळे नवीन खरीप कांद्याची मोठ्या प्रमाणातील आवक नोव्हेंबरमध्येच सुरू होण्याची शक्यता आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील कारेगाव येथील कांदा उत्पादक नितीन पटारे यांच्या मते, दक्षिणेकडील कांद्याची आवक आणि खरीप कांद्याची बाजारातील एंट्री लांबल्याने सध्या महाराष्ट्रातील साठवलेल्या कांद्यावर बाजाराची भिस्त आहे. त्यामुळे पुढील काळात दर्जेदार कांद्याला चांगला भाव मिळण्याची शक्यता आहे.

# भक्त प्रल्हादगिरी महाराजांच्या त्रिदिनात्मक पुण्यतिथी सोहळयास ध्वजारोहणाने प्रारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा:** तालुक्यातील सुरेशनगर-हंडीनिमगावच्या मध्यावर असलेल्या जागृत स्वयंभू त्रिवेणीश्वर महादेव देवस्थानमध्ये महंत श्री रमेशानंदगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली प.पू.ब्रम्हलिन अजानबाहू भक्त प्रल्हादगिरीजी महाराज यांच्या २८ व्या त्रिदिनात्मक पुण्यतिथी सोहळयास राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या हस्ते धर्म ध्वजारोहणाने बुधवारी भक्तिमय वातावरणात प्रारंभ करण्यात आला.

संत विचारांची कास धरून देशासह धार्मिक वैभव वाढीसाठी एकोप्याने प्रयत्न करा असे आवाहन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलतांना केले

यावेळी झालेल्या पुण्यतिथी सोहळयाच्या शुभारंभ प्रसंगी गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांचे त्रिवेणीश्वरच्या मुख्य प्रवेशद्वारावर आगमन झाल्यावर महंत रमेशानंदगिरी बाबांनी स्वागत केले. तर निघालेल्या मिरवणूकीत त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांच्या पथकाने झांज व लेझीम पथकाद्वारे उत्कृष्ट सादरीकरण केले.

त्रिवेणीश्वर देवस्थानच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या ध्वजाचे गुरुवर्य भास्करगिरी महाराज, स्वामी रमेशानंदगिरी महाराज,अंकुश महाराज जगताप, ज्ञानेश्वर महाराज हजारे,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, बाळू महाराज कानडे,बदाम महाराज पठाडे, श्रीधर महाराज अनुभुले, गणेश महाराज शेजुळ, प्रमोद महाराज रोकडे, हंडीनिमगावचे सरपंच भिवाजीराव आघाव, सुरेशनगरचे सरपंच कल्याणराव उभेदळ,उद्योजक महेंद्र पवार,उद्योजक सुरेशराव उभेदळ,जनार्धन पटारे,गोमाता मूर्तीकार आकाश जामदार, बाळासाहेब साळुंके,विठ्ठल



पाषाण,संभाजीराव मते, रावसाहेब घुमरे,संतसेवक मनोहर जाधव,गोरक गुंजाळ,यांच्या प्रमुख उपस्थितीत वेदमंत्राच्या जयघोषात ध्वज पूजनाद्वारे ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांच्या हस्ते मंदिर प्रांगणात उभारण्यात आलेल्या गोमातेच्या पुतळयाचे पूजन करून भाविकांच्या दर्शनासाठी लोकार्पण केले. त्रिवेणीश्वर शिवलिंगासह योगीराज भक्त प्रल्हादगिरी महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेतले.

यावेळी बोलताना गुरुवर्य भास्करगिरी महाराज म्हणाले की जागृत असलेल्या अजानबाहू भक्त प्रल्हादगिरी बाबांनी हे क्षेत्र निर्जन स्थळ असतांना येथे वास्तव्य केले. संतांचे पाय जेथे लागतात ती भूमी पवित्र होते त्याच पद्धतीने त्रिवेणीश्वरची ही भूमी पवित्र झाली आहे,त्यांच्यानंतर महंत सुनीलगिरी महाराजांनी हे क्षेत्र नावारूपाला आणले तर आज महंत रमेशानंदगिरी बाबांनी विविध कार्यक्रमाद्वारे येथील धार्मिक वैभव वाढविले असल्याचे सांगितले.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी त्रिवेणीश्वर देवस्थान समितीचे सेवेकरी सदस्य, पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित भाविकांना उद्योजक महेंद्र पवार व विरेंद्र पवार यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले तर सेवेकरी विठ्ठलराव पाषाण यांनी उपस्थित भाविकांचे आभार मानले. शुक्रवारी दि.२८ ऑगस्ट रोजी योगीराज भक्त प्रल्हादगिरी बाबांच्या पुण्यतिथी सोहळयाचा मुख्य दिवस असून भागवताचार्य हभप समाधानजी महाराज शर्मा यांच्या किर्तनाने त्रिदिनात्मक सोहळयाची सांगता होणार आहे.यानिमित्ताने होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमाचा व दर्शनाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महंत श्री रमेशानंदगिरीजी महाराज यांनी केले.

# सार्वजनिक बांधकाम कार्यालयाचा कारभार चौकीदाराच्या हाती

## अधिकारी-कर्मचारी गैरहजर; हजेरी व हालचाल रजिस्टरही गायब

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** गंगापूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विशेष प्रकल्प कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सोमवार व मंगळवार, दि. २४ व २५ ऑगस्ट रोजी कार्यालयाची पाहणी केली असता एकही अधिकारी अथवा कर्मचारी उपस्थित नसल्याचे आढळून आले. कार्यालयात केवळ चौकीदार उपस्थित असल्याची नोंद महसूल विभागाने केलेल्या पंचनाम्यात करण्यात आली आहे.

> कार्यालयात कर्मचारी नाहीत, मात्र स्वानाची निवांत झोप!
> सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात अधिकारी-कर्मचारी अनुपस्थित असताना कार्यालय परिसरात स्वान निवांत झोप घेत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

गंगापूर तहसीलदार नवनाथ वागवाड यांच्या आदेशाने महसूल अधिकारी गणेश लोणे यांनी संबंधित कार्यालयाची पाहणी करून पंचनामा केला. यावेळी अधिकारी-कर्मचारी अनुपस्थित असल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे, उपस्थिती तपासण्यासाठी हजेरी रजिस्टर तसेच हालचाल रजिस्टरची मागणी केली असता दोन्ही रजिस्टर कार्यालयात उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले.

काही दिवसांपूर्वी महेश बनसोडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अकोली-वाडगाव येथील कार्यालयाबाबत तक्रार केली होती. त्यानंतर गंगापूर कार्यालयातही अधिकारी-कर्मचारी गैरहजर आढळल्याने त्यांनी तहसीलदारांकडे पंचनामा करण्याची मागणी केली होती. शासकीय कार्यालयात नागरिकांच्या कामांसाठी अधिकारी-कर्मचारी नियुक्त असताना कार्यालयच रिकामे असल्याने नागरिकांनी कामे कोणाकडे मांडायची, असा सवाल उपस्थित होत आहे. संबंधित अधिकारी-कर्मचारी दोन दिवस कार्यालयात का उपस्थित नव्हते, याची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी होत आहे.

## निधन

### प्रताप चव्हाण



**वैजापूर:** तालुक्यातील भगुर येथील रहिवासी प्रताप रुस्तुमराव चव्हाण (वय ५६) यांचे मंगळवारी (दि. २५) सकाळी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर मंगळवारी दुपारी भगुर येथे त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, भाऊ, भावजयी, बहीण, पुतणे, सूना व नातवंडे, असा मोठा परिवार आहे.

### देवराम गायकवाड



**झरेकाठी । वार्ताहर**

आश्वी खुर्द, ता. संगमनेर येथील धार्मिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले, जेष्ठ देवराम कुंडलिक गायकवाड (वय ७५) यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, भावजया, बहीणी, मेव्हणे, मुले सुना, नाती नात जावई असा मोठा परिवार आहे.आश्वी खुर्द ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच अनिल गायकवाड, मुंबई पोलिस मेजर सुनिल गायकवाड, नानासाहेब गायकवाड यांचे वडील तर सुभाष गायकवाड बाळासाहेब गायकवाड सुरेश गायकवाड यांचे बंधु तर पत्रकार संजय गायकवाड यांचे चुलते होत.

# कायदा नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणारे प्रभावी कवच : न्यायाधीश निलेश इंदलकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** कायदा केवळ न्यायालयापुरता मर्यादित नसून प्रत्येक नागरिकाच्या हक्कांचे संरक्षण करणारे प्रभावी कवच आहे. त्यामुळे नागरिकांनी कायद्याची माहिती घेऊन आपल्या हक्कांबाबत जागरूक राहावे आणि गरज भासल्यास उपलब्ध विधी सेवांचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर निलेश इंदलकर यांनी केले.

तालुका विधी सेवा समिती, गंगापूर यांच्या वतीने २४ ऑगस्ट रोजी ढोरेगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी न्यायाधीश इंदलकर प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी तालुका विधी सेवा समितीचे उपाध्यक्ष तथा तहसीलदार नवनाथ वागवाड, गटविकास अधिकारी तथा समितीचे सचिव सुहास वाकचौरे, सहाय्यक गटविकास अधिकारी अक्षय भालेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुषमा पवार, वकील संघाचे अध्यक्ष अनिल इंगळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

ॲड. अमीत बर्वे, ॲड. अविनाश कुलकर्णी, ॲड. विलास वाकचौरे व ॲड. विठ्ठल काळे यांनी बालक, महिला, ज्येष्ठ नागरिक व दुर्बल घटकांचे हक्क, POCSO, NALSA च्या योजना, अमली पदार्थविरोधी कायदे, वाहतूक नियम, अँटी-रॅगिंग, बाल न्याय व्यवस्था, अूठ, मूलभूत कर्तव्ये, महिलांची सुरक्षितता व मोफत विधी सेवांबाबत मार्गदर्शन केले.

प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थी व ग्रामस्थांनी विविध कायदेविषयक प्रश्न उपस्थित केले. तज्ज्ञांनी त्यांच्या शंकांचे निरसन केले. आर्थिक किंवा सामाजिक अडचणींमुळे कोणालाही न्यायापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी विधी सेवा समितीच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन केंद्रप्रमुख राजेश हिवाळे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सूरज आत्महत्या प्रकरण, उपोषणाला युवा लहुजी भीम सेनेचा पाठिंबा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** ऑल इंडिया यूथ फेडरेशन आणि ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनच्या वतीने वैजापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासमोर एकदिवसीय उपोषण करण्यात आले. खंडाळा येथील सूरज शिंदे या युवकाने नीट (छएएढ) परीक्षेच्या निकालानंतर आत्महत्या केल्याच्या घटनेत न्याय मिळावा, या मागणीसाठी हे उपोषण करण्यात आले. या उपोषणाला युवा लहुजी भीम सेना संघटनेच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला. युवकांच्या प्रश्नांबाबत शासनाने संवेदनशील भूमिका घेत सूरज शिंदे यांच्या कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी युवा लहुजी भीम सेना महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष रुद्रा शेजवळ, संघटनेचे सचिव सागर मोटे, कोषाध्यक्ष दिनेश त्रिभुवन, सदस्य दिनेश वैरागर, रोहित त्रिभुवन, विशाल भाऊ बागुल आदी उपस्थित होते.





CHANGE OF THE NAME

My old Name is Pinjari She Sharif She Bashir But My New Name is Sharif Bashir Pinjari (M-25502528) At Post Waghali (Indiranagar ), Tal Chalisgaon, Dist Jalgaon -424102.



## छोटी जाहिरात

### हॉटेल स्टाफ पाहिजेत

श्रीरामपूर - वाकडी - राहाता रोडवरील परमिट रूम आणि फॅमिली रेस्टॉरंटसाठी खालील पदांवर तातडीने कर्मचारी हवे आहेत.वेटर ४ (स्थानिक तसेच इतर राज्यातील कामगार चालतील) हेल्पर २, सफाई व भांडी धुण्यासाठी कामगार किंवा जोडपे पाहिजेत.आकर्षक आणि वेळेवर पगार व राहण्याची उत्तम सोय मोफत उपलब्ध आहेत.

संपर्क
मोबाईल नंबर
९९७५६२३६६३


# शेतकऱ्यांच्या बांधावर भाजपा पदाधिकारी; विविध प्रश्नांवर साधला संवाद

**दिपक बरकसे । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील करंजगाव येथे शेतकऱ्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि शेतीशी संबंधित प्रश्न प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी करंजगाव, ता. वैजापूर येथे शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन संवाद साधला. भाजपा प्रदेश सरचिटणीस सुनील राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या संवादात शेतकरी हिताच्या विविध योजनांसह शेतीमालाच्या बाजारभावावर सविस्तर चर्चा करण्यात आली.



यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, वीजबिल माफी, शिवना-टाकळी मध्यम प्रकल्पाचे पाणी, शेतकऱ्यांना वीजपुरवठा तसेच शेतीमालाला मिळणारा बाजारभाव आदी विषयांवर शेतकऱ्यांकडून माहिती व सूचना जाणून घेण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अडचणी समजून घेऊन त्या शासन दरबारी मांडण्यासाठी हा संवाद महत्त्वाचा असल्याचे भाजपा पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

शासकीय योजनांची अंमलबजावणी करताना अधिकाऱ्यांच्या पातळीवर येणारे अडथळे कसे दूर करता येतील, याबाबतही शेतकऱ्यांकडून सूचना घेण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यावर योग्य तोडगा काढण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचा विश्वास यावेळी पदाधिकाऱ्यांनी दिला.

यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, नगराध्यक्ष डॉ. दिनेशभाऊ परदेशी, वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती कल्याण दांगोडे, जिल्हा सरचिटणीस दशरथ बनकर, ज्ञानेश्वर जगताप, कैलास पाटील, देविदास पवार, आबा वाणी, गोरख पाटील घायवट, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश इंगळे, भाजपा तालुकाध्यक्ष सुरेश राऊत, तालुका सरचिटणीस संतोष पाटील मिसाळ, ज्येष्ठ नेते सारंगधर डिके यांच्यासह सरपंच सतीश रावते, सरपंच मोहनराव उगले, महेश भालेराव, सचिन घोडके, आप्पा पाटील घोडके, अशोक उशिरे, तंटामुक्ती अध्यक्ष रामकिसन तात्या घोडके, बाबासाहेब दांगोडे, संतोष आवारे, विपिन साळे, आकाश शेळके, वसंत शेलार, प्रमोद देशमुख, योगेश वाघ, गणेश निघोटे, संजय उगले, आकाश शिंदे आदी उपस्थित होते.

# जलतरण क्रीडा स्पर्धेत सोनई महाविद्यालयाला घवघवीत यश

**सोनई :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन जलतरण क्रीडा स्पर्धा प्रवरा रुरल अभियांत्रिकी महाविद्यालय, प्रवरानगर-लोणी येथे उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेत मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनईच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले.

महाविद्यालयाचा विद्यार्थी मयूर अशोक फुलपगार (एस. वाय. बी. ए.) याने ४०० मीटर व ८०० मीटर फ्रीस्टाईल या दोन्ही क्रीडा प्रकारांत प्रथम क्रमांक पटकाविला. थावांगथापा लुवांग (टी. वाय. बी.एससी.) याने १०० मीटर फ्रीस्टाईल स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. तसेच कु. पवार काजल दीपक (एफ. वाय. बी. ए.) हिनेही आपल्या क्रीडा प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाच्या यशात भर घातली.या सर्व खेळाडूंना महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रवींद्र खंदारे यांचे मार्गदर्शन लाभले.

खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मुळा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष उदयन गडाख, सचिव उत्तमराव लोंढे, सहसचिव डॉ. विनायक देशमुख तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोरक्षनाथ कल्हापुरे यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले.

जलतरण क्षेत्रातील या उल्लेखनीय यशामुळे सोनई महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# विभागीय कृषी सहसंचालकांची सावित्री महिला शेतकरी गटास भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील जळगाव येथील सावित्री महिला शेतकरी गटाला विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी भेट देऊन महिला शेतकऱ्यांशी विविध विषयांवर संवाद साधत मार्गदर्शन केले. कृषी विभाग व पाणी फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

फार्मर कप स्पर्धेत सहभागी झालेल्या सावित्री महिला शेतकरी गटातील महिलांशी वानखेडे यांनी संवाद साधला. गटाची स्थापना, एकत्रित गटशेती तसेच माती परीक्षण, पीक निवड, बियाणे व खतांची सामूहिक खरेदी, पिकांची लागवड, आंतरमशागत आणि खत व्यवस्थापन याबाबत त्यांनी माहिती घेतली.

महिलांनी दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क, जीवामृत निर्मिती तसेच चिकट सापळे, पक्षी थांबे व कामगंध सापळ्यांचा पिकांमध्ये वापर केला असल्याची माहिती दिली. गटाच्या माध्यमातून शेतीवरील उत्पादन खर्च कमी करून उत्पादन वाढविण्यासाठी विविध तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, तसेच कृषी विभागाच्या एसओपीचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन वानखेडे यांनी केले. कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ हिंगोली यांनी पिकांवरील कीड-रोग व्यवस्थापन व जैविक औषधांच्या वापराबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार, तालुका कृषी अधिकारी व्यंकट ठक्के, 




सहाय्यक कृषी अधिकारी बळीराम ठेंगडे, राजेंद्र पंडोरे, अविनाश पैठणकर, पाणी फाउंडेशनचे प्रतिनिधी, सरपंच संभाजी जगताप तसेच महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन अविनाश काळे यांनी केले.

# मदर तेरेसा यांचे मानवसेवेचे कार्य प्रेरणादायी : विजय खाजेकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** नव स्वराज्य सेनेच्या वतीने मदर तेरेसा चौक येथे मदर तेरेसा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मदर तेरेसा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी नव स्वराज्य सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष विजयराव खाजेकर यांनी मदर तेरेसा यांच्या कार्याला उजाळा देताना सांगितले की, मदर तेरेसा यांनी आपले संपूर्ण आयुष्य गरीब, वंचित, निराधार आणि गरजूंच्या सेवेसाठी समर्पित केले. मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा असून त्यांच्या सेवाभावी कार्यातून समाजाने प्रेरणा घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास ठाकूर सर, शरद चव्हाण, अजय कोकाटे, दशरथ भोंगळे, दत्तू शिरसाठ प्रवीण कदम यांच्यासह नव स्वराज्य सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी मदर तेरेसा यांच्या समाजसेवेच्या कार्याचे स्मरण करून त्यांना अभिवादन केले.



## द • ख • ल

### शहरटाकळीत 'ओजस्वी ॲग्रो टेक्निकल सर्व्हिसेस'चा रविवारी शुभारंभ

**दहिगाव ने :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने परीसरातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, कृषी निविष्ठा व तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'ओजस्वी ॲग्रो टेक्निकल सर्व्हिसेस' या नव्या कृषी सेवा दालनाचा शुभारंभ रविवारी (दि. ३० ऑगस्ट) रोजी करण्यात येणार आहे. आंत्रे फाटा ( भातकुडगाव - दहिगाव ने रोडवर) शहर टाकळी येथे सुरू होणाऱ्या या दालनाचे उद्घाटन माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांची प्रमुख उपस्थितीत व शुभहस्ते होणार आहे. तसेच दध्नेश्वर संस्थान, दहिगाव-ने येथील ह.भ.प. सुदामदेव महाराज शास्त्री यांचे आशीर्वाद लाभणार आहेत.कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी अंकुश जोगदंड, तालुका गुणनियंत्रण अधिकारी सुनील होडशिळ तसेच कृषी अधिकारी, पंचायत समिती शेवगावचे सारंग दुगम यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. शहरटाकळी चे प्रगत शेतकरी आबासाहेब जनार्दन पाटील राऊत, एकनाथ जनार्दन पाटील राऊत व अमोल आबासाहेब पाटील राऊत, संचालक कृष्णा एकनाथ पाटील राऊत यांच्या पुढाकारातून हे दालन सुरू होत आहे. उद्घाटन सोहळ्यास परिसरातील शेतकरी, कृषी क्षेत्राशी संबंधित व्यक्ती व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राऊत परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

### जाती-पातीच्या भिंतींमुळे राज्याचा विकास खुंटला : संभाजी दहातोंडे

**अहिल्यानगर :** महाराष्ट्राला संतांची समृद्ध परंपरा लाभली असून, संत ज्ञानेश्वर महाराज, संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज, संत मुक्ताबाई, संत जनाबाई आणि संत सावता माळी यांच्या विचारांची आज समाजाला खरी गरज आहे. राज्यात निर्माण होत असलेल्या जाती-पातीच्या भिंती आणि त्यावर आधारित राजकारणामुळे सामूहिक विकासाला खीळ बसत आहे. त्यामुळे अखिल भारतीय मराठा महासंघाने राज्यभर 'शेतकरी-वारकरी विचारांचा शिवजागर' उपक्रम सुरू केला आहे, अशी माहिती महासंघाचे प्रदेशाध्यक्ष तथा राष्ट्रीय सरचिटणीस संभाजी दहातोंडे यांनी दिली. अहिल्यानगर येथे अखिल भारतीय मराठा महासंघाची विभागीय आढावा बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस प्रा. राज गवांदे, बिभीषण खोसे, सुनील चौधरी, रावसाहेब मरकड, सुनील निमसे, ज्ञानेश्वर फसले, शामराव पवार, संतोष हंबर, नानाभाऊ डोंगरे, संतोष पागिरे, दत्ता शिंदे, डॉ. ज्ञानदेव कोरडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्रा सुटकेला ३६० वर्षे पूर्ण होत असून, अखिल भारतीय मराठा महासंघाच्या स्थापनेलाही सव्वाशे वर्षे पूर्ण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि वारकरी विचारांच्या माध्यमातून समाजात शिवविचार जागविण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आल्याचे दहातोंडे यांनी सांगितले.

### सनातन धर्मसभेच्यावतीने आज श्रावणी

**अहिल्यानगर :** येथील सनातन धर्मसभेच्यावतीने नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने २७ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता श्रावणीचा कार्यक्रम महाजन गल्ली येथील चतुर्वेद भवन येथे धर्मसभेचे अध्यक्ष वेदमूर्ती महेश रेखे तसेच विक्रमादित्य देवव्रत रेखे यांच्या मंत्रघोषात होणार आहे. समाजातील सर्व बांधव पुरोहित मंडळ संस्थेचे सभासद, सदस्य यांनी आपली साहित्य घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन धर्मसभेचे ज्येष्ठ उपाध्यक्ष निळकंठ देशमुख, मंत्री दिनकरराव देशमुख, खजिनदार उमेश नगरकर, वेदमूर्ती उमेश वाळुंजकर, निलेश धर्माधिकारी आदींनी केले आहे. गेल्या शंभर वर्षांपासून ही संस्था श्रावणीचा कार्यक्रम दरवर्षी आयोजित करते. श्रावणाच्या निमित्ताने होत असलेल्या या कार्यक्रमास समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन धर्मसभेचे उपाध्यक्ष डॉक्टर नंदकुमार मुळे, मंत्री रमेश देशपांडे यांनी केले आहे.

### शाळेने केलेला सन्मान आमच्यासाठी मातृसन्मानासारखा : शैलेश उपासनी



**अहिल्यानगर :** हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालयातील माजी विद्यार्थी तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त पोलीस उपनिरीक्षक शैलेश उपासनी आणि अग्निशमन दलाचे प्रमुख गणपतराव मिसाळ यांचा विद्यालयाच्या वतीने नुकताच भव्य सत्कार करण्यात आला. विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, माजी विद्यार्थी, पालक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्याला जुन्या आठवणींना उजाळा देत भावनिक वातावरण निर्माण झाले. यावेळी आपल्या आभार मनोगतात शैलेश उपासनी यांनी आपल्या जीवनातील यशाचे श्रेय दादा चौधरी विद्यालयाला आणि तेथील शिक्षकांनी दिलेल्या संस्कारांना दिले. दादा चौधरी विद्यालयानेच आम्हाला घडविले. आमच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत विद्यालयाचे योगदान अत्यंत मोठे आहे. याच विद्यालयात आमच्यात नेतृत्वगुण, वक्तृत्वकला, सामाजिक भान आणि शैक्षणिक प्रगतीची पायाभरणी झाली. शिक्षकांनी दिलेले संस्कार आणि शिकवण आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आम्हाला उपयोगी ठरली, असे उपासनी यांनी सांगितले राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त या दोन्ही माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाचे नाव उज्ज्वल केल्याबद्दल त्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### नारळी पौर्णिमेनिमित्त महर्षी मार्कंडेय महामुनींचा रथउत्सव

**अहिल्यानगर :** भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याचा मंगल संगम घडविणाऱ्या नारळी पौर्णिमा उत्सवाचे आयोजन यंदा अहिल्यानगर येथे मोठ्या उत्साहात करण्यात आले आहे. पंच कमेटी पद्मशाली ज्ञाती समाज, श्री महर्षी मार्कंडेय देवस्थान ट्रस्ट आणि पद्मशाली विद्या प्रसारक मंडळ ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या संयुक्त सहकार्याने नारळी पौर्णिमा उत्सव २०२६ साजरा करण्यात येणार असून, या उत्सवाचे प्रमुख आकर्षण असलेला महर्षी मार्कंडेय महामुनी रथउत्सव व भव्य पालखी मिरवणूक भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. नारळी पौर्णिमा हा पद्मशाली समाजाच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेतील अत्यंत श्रद्धेचा उत्सव मानला जातो. या पवित्र पर्वानिमित्त महर्षी मार्कंडेय महामुनींच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक होण्याची आणि समाजबंधुत्वाची वीण अधिक घट्ट करण्याची संधी समाजबांधवांना मिळणार आहे. ।। ॐ गणपतेय नमः ।। ॐ मार्कंडेय महामुनी नमः ।। या मंगल जयघोषाने उत्सवाचे वातावरण भक्तिरसाने भारून जाणार आहे. उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, रुद्राभिषेक, होमहवन आणि जाणव परिधान यांसारखे धार्मिक विधी होणार आहेत. त्यानंतर महर्षी मार्कंडेय महामुनींचा रथउत्सव व पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत विविध पारंपरिक व सांस्कृतिक पथकांचा सहभाग राहणार असून, सोहम अकॅडमी चे मल्लखांब प्रात्यक्षिक, दिंडी पथक, कोलालू पथक, लेझीम पथक, तालयोगी चे ढोल-ताशा पथक, महिला फुगडी पथक तसेच आकर्षक शोभायात्रा हे यंदाच्या उत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

# गणेश मंडळांनी समाजप्रबोधनासह संस्कृतीचे जतन करावे : महापौर

## गणेशोत्सव देखावा स्पर्धेत यंदा गड-किल्ल्यांचाही समावेश

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सवानिमित्त सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धे चे आयोजन करण्यात येणार आहे. समाजप्रबोधन, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन तसेच विविध देखाव्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जतन व्हावे आणि गणेश मंडळांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेच्या नियोजनासाठी महापौर ज्योतीताई गाडे यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धा समितीची बैठक संपन्न झाली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब बारस्कर, रोहन सानप, समिती सदस्य, ज्येष्ठ सिनेमा अभिनेते श्रेणिक शिंगवी, गड-किल्ले अभ्यासक अभिजीत दरेकर, आर्किटेक्ट व चित्रकार अजय अपूर्वा, प्रसिद्धी विभाग व सांस्कृतिक विभाग प्रमुख शशिकांत नजन, क्रीडा अधिकारी फिलिप्स, लेखा निरीक्षक गणेश लईचट्टी आदींसह समितीचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, यावर्षीपासून ऐतिहासिक देखावे या विषयामध्ये गड-किल्ल्यांच्या देखाव्याचा



समावेश करण्यात आला आहे. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा समाजासमोर आणण्यास मदत होणार आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधन, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन तसेच महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जतन करण्याचे काम करावे. विविध देखाव्यांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश आणि जनजागृती निर्माण व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

गणेश विसर्जन मिरवणूक मराठमोळ्या पद्धतीने, आपल्या संस्कृतीचे जतन करणारी, समाजप्रबोधनपर, शिस्तबद्ध आणि पारंपरिक पद्धतीने काढणाऱ्या मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी यंदा पारितोषिकांच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. समाजप्रबोधनपर देखाव्यांना २५ हजारांचे प्रथम पारितोषिक सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धेतील समाजप्रबोधन देखावा या प्रकारात स्वच्छता अभियान, पर्यावरण संतुलन, पाणीबचत आदी विषयांवरील देखावे सादर करता येणार आहेत. तसेच व्यसनमुक्ती, प्लास्टिकमुक्ती, बेटी बचाव-बेटी पढाव, बालविवाह प्रतिबंध, जागतिक महामारी आदी विषयांवर जनजागृती करणाऱ्या देखाव्यांचाही स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे.

या प्रकारातील उत्कृष्ट देखाव्यांना प्रथम क्रमांकासाठी २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी १५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी १० हजार रुपये अशी पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

धार्मिक व आध्यात्मिक देखावे या प्रकारात प्रथम क्रमांक २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक १५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांक १० हजार रुपये अशी पारितोषिके राहणार आहेत.

तसेच जीवंत देखावे या स्पर्धेमध्ये सोशल मीडिया व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित देखाव्यांचाही समावेश करण्यात आला आहे.

# जवानांसाठी राखी उपक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

## न्यू इंग्लिश स्कूलमध्ये पर्यावरणपूरक राखी निर्मिती कार्यशाळा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**निघोज :** भारतीय डाक विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'एक राखी जवानांसाठी' या अभिनव उपक्रमाला न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, पारनेर येथील विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमांतर्गत विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विशेष पर्यावरणपूरक राखी निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींनी कलात्मक आणि आकर्षक २५०० राख्या तयार करून जवानांप्रती आदर, कृतज्ञता व देशप्रेमाची भावना व्यक्त केली.

प्रा. कचरू शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या राख्या देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या जवानांपर्यंत पाठविण्यात येणार आहेत. सण-उत्सवाच्या काळातही कुटुंबापासून दूर राहून देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या त्यागाची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी, तसेच त्यांच्याप्रती कृतज्ञतेची भावना निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. कचरू शिंदे म्हणाले, आपले जवान सण-उत्सवाच्या दिवशीही आपल्या कुटुंबापासून दूर राहून देशाच्या सीमेचे रक्षण करतात. तुमच्या हाताने तयार झालेली राखी त्यांच्या मनगटावर बांधली जाईल, तेव्हा देशातील असंख्य लहान भावंडे आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी आहेत, याची जाणीव त्यांना होईल. आपण टीव्ही आणि सिनेमात अनेक नायक पाहतो; मात्र देशाचे खरे नायक सीमेवर कर्तव्य बजावणारे आपले जवान आहेत.

विविध प्रकारच्या कलात्मक राख्या तयार करण्यासाठी कलाशिक्षक ज्ञानेश्वर कवडे यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत त्यांनी राखी निर्मितीच्या विविध पद्धती समजावून सांगितल्या. या उपक्रमासाठी पारनेर शहराचे पोस्ट अधिकारी अमित कोरडे व संतोष झावरे यांचे विशेष सहकार्य लाभले. अमित कोरडे यांच्या हस्ते कौशल्यपूर्ण राखी तयार करणाऱ्या तसेच मोठ्या संख्येने राख्या भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रा. कचरू शिंदे, संतोष इंगळे, अजित दिवटे, श्रीकांत शिंदे, रवींद्र काळे, वैशाली सालके, सुरेखा थोरात आणि कल्पना नरसाळे यांनी विशेष सहकार्य केले.

# शिक्षणाला तंत्रज्ञानाची जोड, स्वच्छतेला संस्कारांची साथ!




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून गरजूंपर्यंत मदत पोहोचविता येते, याचे समाधान काम करण्याची नवी ऊर्जा व प्रेरणा देते. श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे कार्य शिक्षणाभिमुख असल्याने प्रशालेला उपयुक्त साहित्य देताना मनस्वी आनंद होत आहे, असे प्रतिपादन रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. सईद शेख यांनी केले. रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीच्या वतीने श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेला इंटरॅक्टिव्ह टीव्ही पॅनल, हात धुण्यासाठी स्टील वॉश बेसिन तसेच ओला व सुका कचरा संकलनासाठी प्लास्टिक ड्रम भेट देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षणासोबतच स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचे संस्कार मिळण्यास मदत होणार आहे. यावेळी डॉ. सईद शेख, निखिल कुलकर्णी, ॲड. ज्योत्स्ना ससाणे, शुभश्री पटनाईक, प्रियंका चिखले, श्रीपाद कुलकर्णी, सचिव सुरेश क्षीरसागर, शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे व पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

# ईद-ए-मिलादनिमित्त अहिल्यानगर शहरात भव्य झेंडा मिरवणूक!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** ईद-ए-मिलाद (मोहम्मद पैगंबर जयंती) निमित्त अहिल्यानगर शहरात बुधवारी उत्साहपूर्ण वातावरणात भव्य झेंडा मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत युवकांसह अबालवृद्ध मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात विविध रंगांचे झेंडे घेत भाविकांनी मिरवणुकीत सहभाग नोंदविला. शहरातील विविध भागांतून मिरवणूक मार्गक्रमण करत असताना नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे स्वागत केले.

दुपारी सुमारे दीड वाजता शहरातील जामा मशीद येथे नमाज पठण करून झेंडा मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर मिरवणूक पटवर्धन चौक, चितळे रोड, नेता सुभाष चौक, गांधी मैदान मार्गे तख्ती दरवाजा मशीद येथे पोहोचली. तेथे या पहिल्या टप्प्यातील मिरवणुकीचा समारोप करण्यात आला.

यानंतर सायंकाळी सहा वाजता तख्ती दरवाजा मशीद येथून मुख्य झेंडा मिरवणुकीला प्रारंभ झाला. यावेळी मोठ्या संख्येने भाविक मिरवणुकीत सहभागी झाले. पारंपरिक उत्साहात आणि धार्मिक वातावरणात मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये लहान मुले व महिलांचा देखील सहभाग होता.

ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध चौकांमध्ये आकर्षक सजावट करण्यात आली होती. ठिकठिकाणी विद्युत रोषणाई करण्यात आल्याने परिसर उजळून निघाला होता. मिरवणूक ज्या मार्गावरून जात होती, त्या ठिकाणी नागरिकांनी उत्साहाने स्वागत केले.

चौका-चौकात मिरवणुकीतील भाविकांसाठी प्रसाद वाटपाचे नियोजन करण्यात आले होते. विविध ठिकाणी नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी भाविकांना प्रसादाचे वाटप केले. त्यामुळे मिरवणुकीच्या मार्गावर उत्साहाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले होते. झेंडा मिरवणुकीचे विशेष आकर्षण म्हणजे युवकांसह लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांचा मोठ्या प्रमाणातील सहभाग. हातात झेंडे घेऊन नागरिक मोठ्या उत्साहाने मिरवणुकीत सहभागी झाले होते. ईद-ए-मिलादचा आनंद आणि उत्साह शहरभर पाहायला मिळाला.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेच्या विद्यार्थ्यांच्या राख्या जवानांकडे रवाना!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** रक्षाबंधनाचा आनंद, गोडवा आणि स्नेह सरहद्दीवर तैनात असलेल्या भारतीय जवानांना देण्यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या आकर्षक राख्या सरहद्दीवर देशाचे रक्षण करणाऱ्या भारतीय जवानांना पाठविल्या आहेत. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या 'राखी बनवा कार्यशाळे'त विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

अहिल्यानगर लायन्स क्लब, लिओ क्लब आणि घर घर लंगर सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच भारतीय डाक विभागाच्या सहकार्याने 'दिल से सरहद तक' हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी प्रेमाने आणि आपुलकीने तयार केलेल्या राख्या भारतीय जवानांपर्यंत पोहोचविण्यासाठी पोस्टाने पाठविण्यात आल्या. आपल्या कुटुंबापासून दूर राहून देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या जवानांना रक्षाबंधनाच्या दिवशी आपल्या हाताने तयार केलेली राखी मिळावी, या भावनेतून विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला. राखी बनवा कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी विविध रंगांचे दोरे, मणी, झिरमिळ्या, रंगीत कागद, फेटी तसेच विविध कलात्मक साहित्याचा वापर करून अत्यंत सुंदर, आकर्षक आणि कल्पक राख्या तयार केल्या. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कल्पनेनुसार राखी तयार करताना त्यामागील भावनाही जपल्या. ही राखी आपल्या भावाला बांधण्यासाठी नसून देशाच्या रक्षणासाठी सीमेवर खंबीरपणे उभ्या असलेल्या जवानांसाठी आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. त्यामुळे राखी तयार करताना विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह आणि भावनिक वातावरण पाहायला मिळाले. 'आपण सुरक्षित आहोत, कारण जवान सीमेवर जागता पहारा देत आहेत' ही भावना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या छोट्याशा कृतीतून जवानांप्रती असलेला सन्मान, प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त झाली. या कार्यशाळेचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी केवळ राख्या तयार केल्या नाहीत, तर भारतीय संस्कृतीतील रक्षाबंधनाचे महत्त्वही समजून घेतले. रक्षाबंधनातील 'रक्षा' आणि 'बंध' या दोन शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कृतीतून अनुभवला.

# दोन वर्षे एमआयडीसीच्या ताब्यात जमीन; प्रशासनाच्या संरक्षणावर प्रश्नचिन्ह

## श्रीगोंद्यात ६२४ एकरवरील जमिनीपैकी जवळपास १०० एकरांवर खासगी शेतीचे अतिक्रमण?

सर्जेराव साळवे । राष्ट्र सह्याद्री



**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ परिसरातील पार्वतवाडी व पिसोरे बुद्रुक येथील २५२ हेक्टर ४३ आर म्हणजेच सुमारे ६२४ एकर जमीन दोन वर्षांपासून एमआयडीसी च्या ताब्यात असतानाही, त्यापैकी जवळपास १०० एकरांवर खासगी शेतीचे अतिक्रमण सुरू असल्याचा गंभीर आरोप स्थानिकांकडून होत आहे.

या जमिनीवर डाळिंब, ऊस, पपई तसेच विविध पिके उभी असल्याचे दिसून येत असल्याने एमआयडीसीच्या ताब्यातील शासकीय जमीन प्रत्यक्षात कोणाच्या वापरात आहे? असा सवाल उपस्थित झाला आहे.

**एमआयडीसीच्या जागेतून मोठ्या प्रमाणात अवैध पद्धतीने मातीचोरीचा**

प्रकार गेल्या ८ महिन्यापासून चालू होता. अद्याप त्यावर गुन्हा दाखल करण्यात प्रशासनाला अपयश आले आहे. या जागेत आता खाजगी शेतीचे क्षेत्र वाढले असल्याने एमआयडीसी प्रशासन आता ताबा घेण्यासाठी कोणती पावले उचलणार ? याकडे लक्ष लागले आहे.

विशेष म्हणजे, १६ एप्रिल २०२४ रोजी महसूल विभागाने प्रत्यक्ष जागेवर एमआयडीसीला ताबा दिला होता. त्यानंतर जमिनीचे सीमांकन, संरक्षण, कुंपण आणि अनधिकृत वापर रोखण्याची जबाबदारी प्रशासनाची असताना आजही मोठ्या क्षेत्रावर शेती सुरू असल्याने एमआयडीसी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**एमआयडीसी प्रशासनाने आता जागे होण्याची गरज**

६२४ एकर शासकीय जमीन औद्योगिक विकासासाठी राखीव असताना त्यातील जवळपास १०० एकर क्षेत्र खासगी शेतीसाठी वापरले जात असेल, तर हा प्रकार केवळ अतिक्रमणाचा नसून शासकीय मालमत्तेच्या संरक्षणातील गंभीर त्रुटीचा विषय ठरतो.

एमआयडीसी प्रशासन व महसूल विभागाने तातडीने संयुक्त पाहणी करून शेतीखालील क्षेत्राचे मोजमाप, पिकांची नोंद, संबंधित शेतकऱ्यांची माहिती, पाणी-वीज वापर, सीमांकन आणि अतिक्रमणाची वस्तुस्थिती स्पष्ट करणे गरजेचे आहे.

दोन वर्षांपूर्वी ताबा घेतल्यानंतरही शेती सुरू असेल, तर एमआयडीसी चा ताबा नेमका कुठे आहे? असा थेट सवाल आता नागरिकांकडून उपस्थित होत आहे. प्रशासनाने कागदावरील ताब्यापलीकडे जाऊन प्रत्यक्ष जमिनीवर उतरून कारवाई करण्याची वेळ आली आहे. दरम्यान, या आरोपांबाबत एमआयडीसी प्रशासन व महसूल विभागाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. प्रत्यक्ष पाहणी व चौकशीनंतरच अतिक्रमणाचे नेमके क्षेत्र आणि जबाबदार व्यक्ती स्पष्ट होणार आहेत.

## दखल

### वाघोलीतील हॉटेल्सची तपासणी करा

**वाघोली :** वाघोली व परिसरातील हॉटेल, धाबे, बेकरी, स्वीट होम तसेच विविध खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्या छोट्या-मोठ्या आस्थापनांची अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

राज्यात अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्या व्यावसायिकांवर एफडीएकडून कारवाई सुरू आहे. या पार्श्वभूमीवर वाघोली परिसरातील खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या आस्थापनांमध्ये अन्नाची गुणवत्ता, स्वच्छता, साठवणूक व्यवस्था, उत्पादन व वापराची मुदत तसेच आवश्यक परवान्यांची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. वाघोली ग्रामस्थ प्रदीप सातव, म्हणाले, खाद्यपदार्थ विक्री करणारे काही व्यावसायिक स्वच्छतेचे नियम पाळत नसतील आणि नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करत असतील, तर अशा आस्थापनांवर कठोर कारवाई करण्यात यावी. एफडीएने नियमित तपासणी मोहीम राबवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

### कापड दुकानाच्या उद्घाटनामुळे नगर रस्त्यावर वाहतूक कोंडी

**वाघोली :** पुणे-अहिल्यानगर महामार्गालगत भाडळे वस्ती परिसरातील कापड दुकानाच्या उद्घाटनावेळी झालेल्या गर्दीमुळे महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली. ग्राहकांनी दुचाकी व चारचाकी वाहने रस्त्यावर अस्ताव्यस्तपणे उभी केल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला. याप्रकरणी वाघोली पोलीस ठाण्याचे व्यवस्थापन करणाऱ्या विराज विक्रम कर्णिक (वय २५, रा. सुनील हाईट्स, लोहगाव रोड, वाघोली; मूळ रा. कोल्हापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ ऑगस्ट रोजी दुकानाच्या उद्घाटनानिमित्त मोठ्या सवलतीच्या ऑफर जाहीर करण्यात आल्या होत्या. त्यामुळे दुकानासमोर ग्राहकांची मोठी गर्दी झाली. गर्दी रस्त्यावर आल्याने आणि वाहनांची योग्य पार्किंग व्यवस्था नसल्याने पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला.दुकान व्यवस्थापनाकडून ग्राहकांची गर्दी आणि वाहनांचे नियोजन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यामुळे महामार्गावर वाहतूक कोंडी होऊन वाहनचालक व नागरिकांना त्रास सहन करावा लागला.याप्रकरणी पोलीस अंमलदार नामदेव विठ्ठल गडदरे यांनी वाघोली पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

### घोडेगाव येथे दोन बंद घरात चोरी ; रोख रक्कम चोरीला



**निरगुडसर :** घोडेगाव ता.आंबेगाव येथील यशिका कॉम्प्लेक्समधील दोन घरांचे कडी-कोयंडे व कुलपे तोडून अज्ञात चोरट्याने घरातील कपाटे उचकटून तब्बल ३५ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी यमुना विनायक पानसरे (वय ६९, रा.प्लॅट क्रमांक १०१, यशिका कॉम्प्लेक्स, घोडेगाव) यांनी घोडेगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ ऑगस्ट सकाळी दहा वाजल्यापासून २६ ऑगस्ट रोजी सकाळी सात वाजण्याच्या दरम्यान ही घरफोडी झाली. अज्ञात चोरट्याने पानसरे यांच्या प्लॅटच्या दरवाजाचा कडी-कोयंडा कशाच्या तरी सहाय्याने उचकटून घरात प्रवेश केला.त्यानंतर कपाटाचे कुलूप व लॉकर उचकटून त्यातील २० हजार रुपयांची रोकड चोरून नेली.तसेच घोडेगाव येथील मंगेश बाळू वरे यांच्या घराचेही कडी-कोयंडे व कुलपे तोडून चोरट्याने घरात प्रवेश केला.कपाट उचकटून त्यातील १५ हजार रुपयांची रोकड लंपास केली. अशा प्रकारे दोन्ही घरांतून एकूण ३५ हजार रुपयांची रोकड चोरीस गेली आहे. येथे उपलब्ध असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरात चोरटे कैद झाले आहे.याप्रकरणी घोडेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अज्ञात चोरट्याचा शोध सुरू आहे. पोलिस उपनिरीक्षक हरिभाऊ नलावडे पुढील तपास करीत आहेत.

### निळू फुले स्मृती कलागौरव पुरस्कार जाहीर

**पुणे :** विश्वकर्मा प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा निळू फुले स्मृती कलागौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. यंदा पुरस्काराचे १८ वे वर्ष असून प्रसिद्ध कीर्तनकार, ज्येष्ठ संपादक, संविधान दिंडीचे संचालक आणि वारकरी सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर आणि महिला बचत गटाच्या अध्यक्षा, उपेक्षितांच्या शिक्षण हक्कासाठी कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या मनीषा सुतार यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रसिद्ध लेखक अनिल गुंजाळ यांच्या 'नापासातील कोहिनूर' या पुस्तकात सुतार यांच्या कार्याची यशोगाथा अधोरेखित करण्यात आली आहे.सिनेअभिनेत्री गार्गी फुले यांच्या शुभहस्ते आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या अध्यक्षतेखाली या पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

# बारामती परिमंडळात वीजचोरी प्रकरणी १७५९ जणांवर कारवाई

## २ कोटी ७२ लक्ष रूपयाची दंड आकारणी..!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** बारामती परिमंडळात वीजचोरी विरोधात धडक मोहिम राबविण्यात येत आहे. गत जुलै ते (दि.१९) ऑगस्ट अखेर वीजचोरीप्रकरणी १७५९ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यातील १३१० प्रकरणात १२ लक्ष २७ हजार युनिटच्या चोरीप्रकरणी २ कोटी ७२ लक्ष रूपयांचा दंड आकारण्यात आला आहे.त्यात सोलापूर मंडळात १०८१ जणांवर कारवाई करून ७०८ प्रकरणात ७ लक्ष ५ हजार युनिटच्या चोरीप्रकरणी १ कोटी ५९ लक्ष रूपयांचा दंड आकारण्यात आला आहे. सातारा मंडळात २४५ जणांवर कारवाई करून २११ प्रकरणात १ लक्ष ४० हजार युनिटच्या चोरीप्रकरणी २७ लक्ष रूपयांचा दंड आकारण्यात आला आहे. तर बारामती ग्रामीण मंडळात ४३३ जणांवर कारवाई करून ३९१ प्रकरणात ३ लक्ष ८२ हजार युनिटच्या चोरीप्रकरणी ८६ लक्ष रूपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १३५ नुसार अनधिकृत जोडणी करणे, मीटरमध्ये छेडछाड करणे, मीटरची अचूक नोंदणी होऊ नये यासाठी उपकरण किंवा इतर पद्धतीचा वापर करणे, छेडछाड केलेल्या मीटरद्वारे वीज वापरणे यासारख्या कृती वीजचोरीच्या कक्षेत येतात. अशा गुन्ह्यास तीन वर्षांपर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकते. वीजचोरीच्या प्रकरणात संबंधित वीज भारानुसार प्रथम व त्यानंतरच्या दोषसिद्धीच्या वेळी दंडाच्या तरतुदीही लागू होतात. त्यामुळे वीजचोरी ही आर्थिकदृष्ट्याही गंभीर बाब ठरू शकते.




तरी थोड्याशा लोभापायी वीजचोरी करू नका, कारण आजचा छोटासा फायदा उद्या मोठ्या कायदेशीर कारवाई आणि दंडाला कारणीभूत ठरू शकतो.

वीजचोरीची कारवाई आर्थिकदृष्ट्या तर महागात पडतेच, पण त्यासोबत होणारा मानसिक त्रासही परवडणारा नसतो.

**वीजचोरीस मदत करणाऱ्यांवरही कारवाई**

कलम १५० नुसार वीजचोरीला प्रोत्साहन देणे, मदत करणे किंवा अशा कृतीस सहकार्य करणे कायद्याने गुन्हा आहे. गुन्ह्यास प्रवृत्त किंवा मदत करणाऱ्या व्यक्तीवर संबंधित गुन्ह्याच्या शिक्षेप्रमाणे कारवाई होऊ शकते. तसेच वीजवाहिन्या, विद्युत साहित्य किंवा मीटरची चोरी करणे हा विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १३६ अंतर्गत स्वतंत्र गुन्हा आहे. त्यासाठी तीन वर्षांपर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्हीची तरतूद आहे. कलम १५१-ब अंतर्गत कलम १३५ ते १४० तसेच कलम १५० मधील गुन्हे दखलपात्र व अजामीनपात्र असल्याची तरतूद आहे. कायद्यातील कलम १५२ नुसार काही परिस्थितींमध्ये वीजचोरीच्या गुन्ह्याचे तडजोडीने निस्तारण करण्याची तरतूद आहे.

**वीजचोरीचे सामाजिक दुष्परिणाम..**

**वीजचोरीमुळे महावितरणचे आर्थिक नुकसान होते तसेच विद्युत यंत्रणेवर अनधिकृत भार पडून वीजपुरवठ्याची गुणवत्ता आणि सुरक्षितता प्रभावित होते. अनधिकृत जोडण्यांमुळे विद्युत अपघात, आग आणि जीवितहानीचा गंभीर धोका निर्माण होतो. तरी वीजचोरी करू नका, वीजचोरीला प्रोत्साहन किंवा सहकार्य करू नका. अनधिकृत वीजजोडणी अथवा वीजचोरीची माहिती असल्यास ती संबंधित महावितरण कार्यालयास कळवावी, असे आवाहन आहे.**

# चाकणच्या विकासासाठी यंत्रणांनी समन्वयाने काम करावे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** चाकण परिसरातील प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणा, संस्था आणि लोकप्रतिनिधींनी समन्वयाने काम करावे. रस्ते, वाहतूक कोंडी, पार्किंग, कचरा व्यवस्थापन, अतिक्रमणे आणि सुरक्षा या प्रश्नांवर प्राधान्याने कार्यवाही करून चाकणच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सहकार्य केले जाईल, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

शासकीय विश्रामगृह येथे चाकण परिसरातील विविध प्रश्न आणि उच्चस्तरीय समितीच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. यावेळी खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबाजी काळे, उपमुख्यमंत्री सचिव डॉ. राजेश देशमुख, पीएमआरडीए आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्यासह संबंधित अधिकारी व उद्योजक उपस्थित होते. चाकणच्या वाढत्या लोकसंख्या आणि औद्योगिक विस्ताराच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेसाठी १०० अतिरिक्त सुरक्षा कर्मचारी नियुक्त करण्याची कार्यवाही सुरू आहे. आवश्यकतेनुसार नवीन पोलिस ठाण्यांबाबतही कार्यवाही करण्यात येणार आहे.रस्त्यांवरील



खड्डे आणि साईडपट्ट्यांची दुरुस्ती ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कामात दिरंगाई झाल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. वाहतूक कोंडीच्या ठिकाणी उपाययोजना, पार्किंग व्यवस्था आणि जड वाहनांच्या वाहतुकीवर नियंत्रणासाठीही नियोजन करण्यात आले आहे. एमआयडीसी परिसरातील उपलब्ध पार्किंग जागा एका आठवड्यात सुरू करून रस्त्यावर उभे राहणारे ट्रक तेथे हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविण्याची कारवाई शुक्रवारपासून सुरू करून महिनाभरात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. गर्दीच्या वेळेत जड वाहनांवर निर्बंध आणण्याबरोबरच औद्योगिक कंपन्यांच्या शिफ्टच्या वेळांमध्ये बदल करण्याबाबतही सूचना देण्यात आल्या आहेत.

कचरा व्यवस्थापनासाठी प्रकल्प :

चाकण परिसरातील १९ गावे आणि एमआयडीसी क्षेत्रासाठी कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येत आहे. प्लास्टिक कचऱ्याच्या समस्येवरही तातडीने उपाययोजना करण्यात येणार आहेत. पादचारी आणि वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी वॉकवे व सुरक्षित रस्त्यांना प्राधान्य दिले जाणार आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी वाहतूक कोंडीवर तातडीच्या तसेच दीर्घकालीन उपाययोजनांचा 'ॲक्शन प्लॅन' निश्चित केल्याची माहिती दिली. तसेच दर शुक्रवारी संबंधित विभागांची बैठक घेऊन कामाचा आढावा घेतला जाणार आहे. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी अतिक्रमणे हटविणे, आवश्यक ठिकाणी रस्ते रुंदीकरण आणि विविध विभागांच्या समन्वयातून वाहतूक व्यवस्थापन करण्याचे नियोजन असल्याचे सांगितले.

चाकणच्या विकासासाठी रस्ते, वाहतूक, कचरा व्यवस्थापन, पार्किंग, सुरक्षा, अतिक्रमणे, गृहनिर्माण सोसायट्या आणि शाळांशी संबंधित प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले.

## चिमुकलीच्या कुटुंबीयांची मंत्री झिरवळ यांनी घेतली भेट; आरोपीला फाशीची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** पिंपळवंडी (ता. जुन्नर) येथे नऊ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून निर्घृण हत्या केल्याच्या घटनेने संतापाची लाट उसळली असताना, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी पीडित कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले. शासन पीडित कुटुंबाच्या पाठीशी असून, त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या प्रकरणातील आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून लवकरात लवकर फाशीची शिक्षा मिळावी, यासाठी शासन प्रयत्नशील राहील, असे मंत्री झिरवळ यांनी सांगितले. तसेच आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून कुटुंबाला शासकीय मदत आणि मुलांच्या शिक्षणासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.



पालक शेतात कामासाठी गेले असताना चिमुकली घरी एकटी होती. त्यावेळी शेजारी राहणाऱ्या २५ वर्षीय आरोपीने सायकल शिकवण्याच्या बहाण्याने तिला गावाबाहेरील उसाच्या शेतात नेऊन हत्या केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी आरोपीची ओळख पटवून त्याला अटक केली. न्यायालयाने त्याला १३ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

घटनेनंतर पिंपळवंडी गावात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. निषेध म्हणून गाव दोन दिवस बंद ठेवण्यात आले होते. यापूर्वी माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी उपसभापती नीलम गोऱ्हे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षा वैशाली नागवडे यांनीही पीडित कुटुंबाची भेट घेतली होती.

## लेखी आश्वासनानंतर उपोषण स्थगित; तूर्तास स्थगितिची भानुदास शिंदेंची घोषणा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दौंड :** शेतकरी व विविध समाजघटकांच्या एकूण १० प्रलंबित मागण्यांसाठी सरकारच्या लेखी हमीपत्रांनंतर उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती रयत क्रांती संघटनेचे राज्य प्रवक्ते भानुदास शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. मात्र, सरकारने दिलेल्या मुदतीत मागण्यांवर अपेक्षित कार्यवाही केली नाही तर शेतकरी व विविध समाजघटकांच्या एकूण १० प्रलंबित मागण्यांसाठी पुन्हा एकदा संघर्षाचे रणशिंग फुंकण्याचा इशाराही त्यांनी दिला.

रयत क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत, दौंड तालुक्याचे आमदार राहुल कुल तसेच प्रशासनाच्या वतीने दौंडचे तहसीलदार अरुण शेलार यांनी यासंदर्भातील



शासकीय पत्रे उपोषणकर्त्यांना सुपूर्द केली. ग्रामस्थांच्या उपस्थितीत या तिन्ही लेखी आश्वासनांवर विश्वास ठेवून उपोषण मागे घेण्यात आले.

उपोषणकर्ते भानुदास शिंदे यांचे आई-वडील तसेच तहसीलदार अरुण शेलार यांच्या हस्ते लिंबू पाणी देऊन ९ व्या दिवशी उपोषणाची यशस्वी सांगता करण्यात आली. भानुदास शिंदे यांच्या उपोषणाला मोठे यश..... १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून बेमुदत आमरण उपोषण सुरू केले होते. तब्बल ९ व्या दिवशी या उपोषणाला मोठे यश मिळाले, सदर उपोषण सलग ९ दिवस चालल्यामुळे शासन, प्रशासन आणि ग्रामस्थांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

मात्र, प्रशासनाला अखेर दखल घ्यावी लागल्याने आणि उपोषणाची सांगता यशस्वी झाल्याने कानगाव व संपूर्ण परिसर आणि तालुक्यामध्ये समाधानाचे वातावरण आहे. सरकार आता या मागण्यांवर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## इन्स्टाग्रामवरील 'आभासी भाईगिरी' तरुणाला महागात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** इन्स्टाग्रामवर शस्त्राचे प्रदर्शन करून दहशत निर्माण करणाऱ्या तरुणाविरुद्ध सुपा पोलिसांनी शस्त्रास्त्र कायद्यान्वये कारवाई केली. सोशल मीडियावरील 'रील'मधून आभासी दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रेम प्रताप जगताप (रा. बाबुर्डी, ता. बारामती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुपा पोलिस ठाण्याच्या सायबर मॉनिटरिंग पथकाला २४ ऑगस्ट रोजी 'premšjagtapš0295' या इन्स्टाग्राम अकाउंटवरून एक व्हिडिओ प्रसारित झाल्याचे आढळले. या व्हिडिओमध्ये जगताप याच्या हातात पिस्तूलसदृश्य वस्तू दिसत असून, 'आलीशान युवा प्रतिष्ठान' असा मजकूर तसेच धमकीवजा व प्रक्षोभक मजकूर वापरण्यात आला होता. ऑडिओमधूनही हल्ल्याचा संदर्भ देत नागरिकांमध्ये भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

पुणे ग्रामीण जिल्ह्यात जिल्हादंडाधिकाऱ्यांचे शस्त्रबंदी व जमावबंदीचे आदेश लागू असताना त्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी सुपा पोलिसांनी स्वतःहून फिर्याद दाखल केली. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३५१(२)(३), २२३, भारतीय शस्त्र कायदा कलम ३(२५) तसेच महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३७(१)(३) व १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार रुपेश साळुंके करीत आहेत.

# 'आधार' अपडेट न केल्यास सेवांमध्ये अडथळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** मुलाचे वय पाच आणि १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आधारमधील बायोमेट्रिक माहिती अद्ययावत करणे बंधनकारक आहे. निर्धारित वेळेत 'मॅंडेटरी बायोमेट्रिक अपडेट' (एमबीयू) न केल्यास आधार प्रमाणीकरणाशी संबंधित सेवांमध्ये अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्याचे आधार अद्ययावत आहे की नाही, याची पडताळणी करून आवश्यक असल्यास तातडीने एमबीयू करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

एमबीयू प्रक्रियेत मुलाच्या हातांच्या बोटांचे ठसे, डोळ्यांच्या बुबुळांचे स्कॅन आणि नवीन छायाचित्र घेतले जाते. आवश्यकतेनुसार संबंधित माहितीची पडताळणीही केली जाते. मुलाच्या वाढीनुसार बायोमेट्रिक माहितीमध्ये बदल होत असल्याने पाच आणि १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ही प्रक्रिया महत्त्वाची ठरते.

निर्धारित वयानंतर बायोमेट्रिक अपडेट न केल्यास आधार प्रमाणीकरणात अडचणी येऊ शकतात. काही परिस्थितींमध्ये आधारशी संबंधित सेवा मिळण्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असल्याने पालकांनी विलंब न करता अपडेट करून घेणे आवश्यक आहे.

जवळच्या अधिकृत आधार सेवा केंद्र, आधार नोंदणी केंद्र किंवा अधिकृत अपडेट केंद्रावर मुलाला सोबत घेऊन एमबीयू करता येते. यासाठी आवश्यक कागदपत्रांसह केंद्रावर जावे लागते.

शाळा प्रवेश, शिष्यवृत्ती, विविध शासकीय योजना, विद्यार्थ्यांची नोंदणी तसेच शैक्षणिक व प्रशासकीय कामांसाठी आधार क्रमांकाचा वापर होत असल्याने मुलांच्या आधारमधील माहिती अचूक आणि अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे.

**पाच आणि १५ वर्षे पूर्ण झाल्यावर एमबीयू :**

**मुलाचे वय पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर आणि पुन्हा १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर बायोमेट्रिक माहिती अपडेट करणे आवश्यक आहे. पालकांनी आपल्या पाल्याच्या आधारची स्थिती तपासून वेळेत ही प्रक्रिया पूर्ण करावी.**

# जलजीवन मिशनही अपयशी; घरात शुद्ध पाणी देण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, नदीजोड प्रकल्प यांसारख्या विविध योजना राबवूनही ग्रामीण भागातील पाणीटंचाई कायम आहे. पावसाळ्यातही अनेक गावांना टँकरवर अवलंबून राहावे लागत असून, जलजीवन मिशनची स्थितीही समाधानकारक नसल्याचा आरोप फोरम ऑफ इंटलेकच्युअल्सचे अध्यक्ष सतीश देशमुख यांनी केला.

ग्रामीण भागातील महिला आणि शाळकरी मुलींना पाण्यासाठी घराबाहेर पडावे लागू नये, घरातच नळाद्वारे शुद्ध पाणी मिळावे, अशी मागणी गेल्या दहा वर्षांपासून केली जात असल्याचे देशमुख यांनी सांगितले. जलजीवन मिशनअंतर्गत मोठ्या प्रमाणावर नळजोडण्या झाल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्ष पाहणीत अनेक ठिकाणी योजना अपूर्ण असल्याचे आढळल्याचे त्यांनी नमूद केले.

काही गावांत नळाचे पाणी केवळ कपडे व भांडी धुण्यासाठी उपलब्ध असून, पिण्याच्या पाण्यासाठी दोन-तीन किलोमीटर अंतरावरील आरओ प्लांटवर अवलंबून राहावे लागत असल्याचा दावा त्यांनी केला. खेड तालुक्यातील वाशेरे येथे सुमारे सव्वातीन कोटी रुपये खर्चून सात किलोमीटर पाइपलाइन टाकली; मात्र डोंगराळ भागाचा विचार न केल्याने पाणीपुरवठा होत नसल्याचे त्यांनी सांगितले. खळद येथेही तांत्रिक त्रुटींमुळे ग्राम पंचायतीने काम थांबविल्याचे त्यांनी नमूद केले.

जलजीवन मिशनमधील कथित अनियमितता आणि खर्चाची कॅगमार्फत चौकशी करावी, अशी मागणी देशमुख यांनी केली. अहिल्यानगर जिल्ह्यात अनियमितता आढळल्यानंतर दहा अभियंत्यांवर कारवाई करून निलंबित केल्याचेही त्यांनी सांगितले.

निधीअभावी अनेक कामे रखडली असून, ठेकेदारांची सुमारे ३५ हजार कोटी रुपयांची बिले थकीत असल्याचा दावा त्यांनी केला. पुणे जिल्ह्यात काही योजना वीज जोडणीअभावी कार्यान्वित झालेल्या नसल्याचेही त्यांनी सांगितले.

पाण्याच्या गुणवत्तेवरही प्रश्न उपस्थित करत खेड तालुक्यातील एका गावातील पाणी तपासणीत ते पिण्यास अयोग्य असल्याचे निष्पन्न झाल्याचे त्यांनी नमूद केले.

पुरंदरमधील दोन आरओ प्लांटच्या पाण्याच्या नमुन्यांत टीडीएसचे प्रमाण केवळ ३६ मिलीग्रॅम प्रतिलिटर आढळल्याचा दावा त्यांनी केला.

## द•ख•ल



### शिवप्रहार संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी संदीप काटे

**पाथर्डी तालुका :** पुणे येथे अधिवेशनामध्ये संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संजीव भोर पाटील यांच्या हस्ते संदीप काटे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्याचा उपाध्यक्षपदी नियुक्तीपत्र देऊन त्यांची निवड करण्यात आली. शिवप्रहार संघटनेच्या १२व्या वर्धापन दिनानिमित्त पुणे येथे कार्यकर्ता मेळावा उत्साहात संपन्न झाला. व्याख्याते गणेशजी शिंदे, आदर्श सेवाव्रत्ती दांपत्यासाठीचा 'समर्पण' पुरस्कार : डॉक्टर सुचेता व डॉक्टर राजेंद्र धामणे यांना शिवप्रहार संघटनेच्या वतीने गौरवण्यात आले, या मेळाव्यास शंकर धोंडगे यांचे सह राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य व प्रा. एम एम तांबे,मराठा महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोंढरे,आदी मान्यवर उपस्थित होते.

### शिवसेना बांधकाम कामगार सेनेच्या दक्षिण विभाग जिल्हा कार्याध्यक्षपदी ज्ञानेश्वर शिंदे



**राशीन :** शिवसेना (शिंदे गट) बांधकाम कामगार सेनेच्या दक्षिण विभाग जिल्हा कार्याध्यक्षपदी ज्ञानेश्वर शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीने दक्षिण विभागातील बांधकाम कामगारांच्या प्रश्नांना आक्रमक नेतृत्व मिळाले असून, कामगारांच्या न्याय हक्कांसाठी संघटना अधिक ताकदीने मैदानात उतरणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. यावेळी शिवसेना शहरप्रमुख नाझीम भाई काजी, अहिल्यानगर वैद्यकीय कक्ष उपप्रमुख तथा बांधकाम कामगार सेना जिल्हा सचिव महेश उकिरडे, संपर्कप्रमुख सागर मासाळ, तसेच दादासाहेब शेळके, राजू उकिरडे, गणेश उकिरडे, सुभाष पवळ यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शिंदे यांच्या नियुक्तीचे शिवसेना पदाधिकारी, बांधकाम कामगार आणि कार्यकर्त्यांकडून स्वागत करण्यात येत असून, दक्षिण विभागात बांधकाम कामगार सेनेची संघटनात्मक ताकद वाढणार का आणि कामगारांच्या प्रश्नांवर शिंदे कोणती भूमिका घेतात, याकडे आता लक्ष लागले आहे.

### प्रा.लक्ष्मण कोठावळे यांचे शैक्षणिक योगदान उल्लेखनीय : रामचंद्र दरे



**टाकळी ढोकेश्वर :** श्री ढोकेश्वर महाविद्यालयाचे प्रा.लक्ष्मण भिकाजी कोठावळे यांचे शैक्षणिक,सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय असल्याचे प्रतिपादन जिल्हा मराठा संस्थेचे अध्यक्ष मा. रामचंद्र दरे यांनी केले. सेवापूर्तीनिमित्ताने प्रा.लक्ष्मण भिकाजी कोठावळे व संगीता कोठावळे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्रा.लक्ष्मण कोठावळे यांनी सेवापूर्तीच्या निमित्ताने जिल्हा मराठा संस्था,ढोकेश्वर महाविद्यालय,विद्यार्थी पालक यांचे सहकार्याबद्दल आभार मानले. कार्यक्रमास सीताराम खिलारी, डॉ.विकासानंद महाराज मिसाळ तसेच निकिता कोठावळे, धनश्री झावरे, अनिता रोकडे,डॉ. हरीश शेळके,शरद कोठावळे, विलास महाराज लोंढे,गंगाधर बांडे, डॉ.वीरेंद्र धनशेट्टी मा.प्राचार्य डॉ.दत्तात्रय खोडदे,प्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे व डॉ.भाऊसाहेब खिलारी आदी उपस्थित होते. डॉ. वासुदेव साळुंके यांनी आभार मानले ह.भ.प. सुपेकर महाराज यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी,आजी व माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

### २७ ऑगस्टला प्रवेशद्वाराचे भूमिपूजन हरिकीर्तन व महाप्रसादाचे आयोजन

**निघोज :** श्री संत सागरदास महाराज समाधी मंदिर, पारनेर येथे गुरुवार दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी श्रावणी भंडारा उत्सव व प्रवेशद्वार भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने नियोजित प्रवेशद्वाराचे भूमिपूजन जय जिजाऊ बहुउद्देशीय प्रतिष्ठान, अध्यक्षा व सामाजिक कार्यकर्त्या सुनिताताई सोबले यांच्या सौजन्याने करण्यात येणार आहे. आ. काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते भूमिपूजन समारंभ होणार आहे. या संपूर्ण धार्मिक कार्यक्रमास ह.भ.प. सचिन महाराज शेटे, पारनेर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या उत्सवामुळे पारनेर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

### श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थानात ३० ऑगस्टला कुस्त्यांचा हगामा

**निघोज :** महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे कुलदैवत असलेल्या पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथील श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान येथे श्रावण महिन्यानिमित्त सालाबादप्रमाणे यंदाही कुस्त्यांच्या हगाम्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी देवस्थान परिसरात हा कुस्त्यांचा हगामा रंगणार आहे. श्री क्षेत्र कोरठण देवस्थान ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या हगाम्यात महाराष्ट्रातील नामांकित पहिलवान मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. निकाली कुस्तीची परंपरा कायम ठेवणाऱ्या या हगाम्याकडे कुस्तीप्रेमींचे विशेष लक्ष लागले आहे. नामवंत मल्लांच्या कुस्त्यांचा थरार पाहण्यासाठी पंचक्रोशीसह विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक व कुस्तीप्रेमी उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. श्री खंडोबा देवाच्या भक्तीबरोबरच ग्रामीण भागातील कुस्तीची परंपरा जपण्याचे कार्य देवस्थान ट्रस्टकडून सातत्याने केले जात आहे. त्यामुळे या कुस्ती हगाम्याला धार्मिक तसेच क्रीडा क्षेत्राच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले आहे. हगाम्यानिमित्त पंचक्रोशीतील सर्व खंडेरायाचे भाविक, ग्रामस्थ आणि कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा तसेच देवस्थान ट्रस्टला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, उपस्थित भाविक व ग्रामस्थांसाठी देवस्थान ट्रस्टच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन शालिनी अशोक घुले, महेश शिरोळे व विश्वस्त मंडळ व ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# कर्जत तालुक्यावर वरुणराजाची वक्रदृष्टी

## नको देवराया अंत आता पाहू... सक्रिय मान्सूनची वाट पाहतायत कर्जतकर

डॉ अफरोजखान पठाण । राष्ट्र सह्याद्री

**ओसंडून वाहणारे नदी-नाले, तलाव यंदा कोरडेठाक पाहण्याची भीषण परिस्थिती**

मागील वर्षी मे महिन्यातच कर्जत तालुक्यात अवकाळी पावसाने साडेतीनशे मिमीचा आकडा ओलांडला होता. त्यांनतर देखील मान्सून पावसाने जोरदार हजेरी लावत धुमाकूळ माजवला होता. यंदा मान्सूनच्या सक्रिय असणाऱ्या तीन महिन्यात अवकाळी पावसाचा ती आकडेवारी ओलांडता आली नाही हे दुर्दैव.







**कर्जत :** मागील वर्षी पावसाने अक्षरशः हैराण केलेल्या कर्जतवासीयांना यंदा मात्र वरुणराजाच्या वक्रदृष्टीने नको देवराया, अंत आता पाहू असे म्हणण्याची वेळ कर्जत तालुक्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांवर आली आहे. मान्सूनचा जवळपास तीन महिन्यांचा कालावधी सरत आला असतानाही तालुक्यात अपेक्षित असा मुसळधार पाऊस झालेला नाही. त्यामुळे नदी-नाले, तलाव, बंधारे आणि छोटे जलसाठे कोरडेठाक पडले असून खरीप पिकांनीही माना टाकण्यास सुरुवात केली आहे.

कडक उन्हाळा आणि अलनिनोच्या प्रभावामुळे यंदा मान्सूनवर चांगलाच परिणाम झाला. पावसाळ्याच्या सुरुवातीला झालेल्या तुरळक सरींमुळे शेतकऱ्यांनी खरीप हंगामाची आशा धरली होती. मात्र त्यानंतर पावसाने उघडीप दिली. काही अपवाद मंडळ क्षेत्रात पाऊस झाला असला तरी तो शेतीसाठी पुरेसा ठरलेला नाही. परिणामी अनेक भागांत जमिनीतील ओलावा कमी होत असून पिकांच्या वाढीवर त्याचा परिणाम झाला. मध्यंतरी रिमझिम पावसाने पिके तरली गेली. मात्र ऑगस्ट महिना फक्त ढगाळ वातावरणातच गेल्याने सोयाबीन, बाजरी, मका, कांदा तसेच अन्य पिकांना मुसळधार पावसाची नितांत गरज आहे. किडीच्या प्रादुर्भावाने काही ठिकाणी पिके कोमेजण्याच्या स्थितीत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. यंदा वरुणराजाच्या वक्रदृष्टीने विहिरी, बोअरवेल तसेच लहान-मोठ्या जलसाठ्यांवरही परिणाम झाला आहे. नदी-नाल्यांना अपेक्षित प्रवाह आलेला नसल्याने पाण्याचे नैसर्गिक स्रोत अद्याप भरलेले नाहीत तर काही कोरडेठाक पडले आहेत. आगामी काळात दमदार पाऊस झाला नाही तर पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

वास्तविक पाहता मागच्या वर्षी आता बस्स झाले, नको येऊ म्हणणाऱ्या कर्जतकरांना मुसळधार बरस असे देवाला साकडे घालण्याची वेळ ओढवली आहे. मागील वर्षी अतिवृष्टी आणि मुसळधार पावसामुळे कर्जत तालुक्यातील नागरिकांना पूरग्रस्त परिस्थितीस सामोरे जात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता.

एकीकडे भीमा दुथडी तर दुसरीकडे सीना धरणात पाण्याची आवक होत असली तरी कर्जतचा मध्य भाग शुष्क पडला आहे. जून-जुलै महिन्यात पावसाने शंभरी (१४०मिमी) ओलांडली. मात्र ऑगस्ट महिना फक्त ढगाळ वातावरणातच सरत आहे. त्यामुळे सीनात पाण्याची आवक असो किंवा भीमानदीस भरमसाठ पाणी कर्जत तालुक्यात सक्रिय मान्सून बरसला नसल्याने सर्वसामान्य शेतकऱ्यांसह नागरिक चिंतातुर झाले आहेत. आता गणपती आणि नवरात्र काळात परतीच्या पावसावर मदार राहणार आहे.

## मातंग समाजाने मुख्य प्रवाहात येणे काळाची गरज : ॲड. कांबळे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**हातगाव :** मातंग समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या लढवय्या आणि संघर्षशील समाज आहे. मात्र, आजच्या बदलत्या काळात केवळ श्रद्धा आणि परंपरांमध्ये अडकून न राहता शिक्षण, सामाजिक जागृती आणि वैचारिक प्रगतीच्या माध्यमातून समाजाने मुख्य प्रवाहात येणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पोतराजच पोर या पुस्तकाचे लेखक ड.अंकुश कांबळे यांनी केले. शेवगाव तालुक्यातील हातगाव येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात व्याख्याते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवा सोसायटीचे चेअरमन ज्ञानदेव अभंग होते. या वेळी अँड. कांबळे म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे केवळ कथा-कादंबऱ्यांचे लेखन नसून ते सामान्य माणसाच्या जीवनातील वास्तव मांडणारे जिवंत साहित्य आहे. त्यांच्या लेखणीतून सामाजिक विषमता, अन्याय आणि संघर्षाला वाचा मिळाली. तर प्रास्ताविकात प्रा. विकास भराट यांनी अण्णाभाऊ साठे यांचे विचार समाजाला दिशा देणारे असल्याचे सांगितले. समाजातील प्रत्येक घटकाने हे विचार आत्मसात करून ते आचरणात आणले, तरच सामाजिक उन्नतीचा मार्ग अधिक भक्कम होईल. अण्णाभाऊंच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे त्यांनी नमूद करत त्यांनी अण्णा भाऊंच्या जीवन चरित्रावर प्रकाश. भराट यांनी टाकला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरपंच अरुण मातंग यांनी केले, तर आभार पत्रकार रावसाहेब निकाळजे यांनी मानले. यावेळी प्रवीण भारस्कर, ॲड. लक्ष्मण बोरुडे, निवृत्ती घोडके, विठ्ठल अभंग,अंकुश अभंग, दत्ता. भराट, दिलीप आंबेकर, गोरख कदम, बाळासाहेब सुसे, अविनाश बुटे, ग्रामविकास अधिकारी संजय दारुणकर, शंकर भराट, यांच्यासह पंचक्रशीतून असंख्य प्रमुख कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## श्री ढोकेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**टाकळी ढोकेश्वर :** समाजातील वाढते व्यसनाधीनतेचे प्रमाण लक्षात घेतले तर समाजातील सर्व घटकांनी व्यसनमुक्तीसाठी सामूहिक प्रयत्न करावेत आणि विद्यार्थ्यांनी पालकांसमोर मोबाईल घेऊन देण्यासाठी हट्ट करण्या ऐवजी घरातील सदस्यांना जडलेले व्यसन सोडवण्यासाठी हट्ट करावा असे प्रतिपादन प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय टाकळी ढोकेश्वर च्या उज्वला दीदींनी केले. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पाचवी ते बारावीच्या चौदाशे शाळकरी विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा घेतली व व्यसनापासून दूर राहण्याचा संकल्प केला त्या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उज्वला दीदी बोलत होत्या.

या प्रसंगी पायमोडे दीदी,प्राचार्य बाळासाहेब खिलारी,पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी विद्यार्थ्यांना उदबोधक मार्गदर्शन केले. यावेळी प्रमोद भाई, रमण भाई, दिपक भाई, सुगंधा माताजी, बाबासाहेब जाधव, रवींद्र मते, श्रीरंग धामणे, संदीप महांडुळे, नारायण शेळके, निलम खिलारी, वैशाली गायखे, कल्पना जाधव, सुमन वाळुंज, प्रिया डव्हणे, सुरेखा ठाणगे, सोनल रोहकले, संदीप खिलारी, मिनाक्षी पवार, विष्णू भद्रे,सोनाली माळवदे,प्रा.अशोक गांगड, योगेश मांडगे, आतिष झावरे, देविदास आठरे, राजेंद्र ढोणे, सचिन महानवर, पोपट जगदाळे, भाऊसाहेब हिंगडे, सुनील झावरे, मिनाक्षी खाडे, प्रा.दळवी, नितीन ढोकळे, मंगेश पोपळघट, रामदास नरवडे, सिमा खोसे, सोनल पायमोडे, अनिकेत बांगर, सुवर्णा दिघे, शिरीष राऊत, पवन कुटे, अनुष्का कांबळे, भाऊसाहेब बांबेरे, अमोल गोरे, नारायण हरेल, सुनिता घोडके उपस्थित होते.

## आरक्षणाच्या हक्कासाठी ओबीसींचा एल्गार

### मंगळवारी मुंबईत लाखोंनी धडक द्या : प्रा.हाके

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**हातगाव :** राज्यातील ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या हक्कावर गदा आणण्याचा प्रयत्न झाल्यास ओबीसी समाज स्वस्थ बसणार नाही. आरक्षणाच्या रक्षणासाठी आता निर्णायक लढाईची वेळ आली असून मतभेद, पक्षीय राजकारण आणि वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून एकसंघ व्हा.येत्या मंगळवारी १ सप्टेंबरला मुंबईत होणाऱ्या एल्गार मेळाव्यात लाखोंच्या संख्येने सहभागी होऊन ओबीसींची ताकद दाखवा, असे आवाहन ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील वामनभाऊनगर येथे आयोजित ओबीसी मेळाव्यात हाके बोलत होते. मराठवाडा दौऱ्यावर जात असताना ते काही काळ थांबले असता उपस्थित कार्यकर्त्यांना त्यांनी मार्गदर्शन केले व यावेळी ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर त्यांनी सरकार आणि राज्यकर्त्यांवर जोरदार टीका केली. हाके म्हणाले की, ओबीसींचे आरक्षण हा संविधानाने दिलेला हक्क आहे. हा हक्क हिरावून घेण्याचा किंवा त्याला धक्का देण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. राज्यात आरक्षणाच्या प्रश्नावर नियमबाह्य पद्धतीने निर्णय घेतले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. ओबीसी समाजाने आता केवळ चर्चा न करता गावागावात संघटन मजबूत ओबीसी विषयावर आक्रमक राहून आपल्या हक्कासाठी संघर्ष उभारला पाहिजे. भागवत शिंगाडे, शिवाजी खेडकर, केशव खेडकर, लक्ष्मण आघाव, मारुती आघाव, अंकुश खेडकर, भीमराज बनसोडे, माणिक गर्जे, भास्कर मासाळकर, संदीप हुगे, गुलाब गव्हाणे, मोहन रामनाथ थोरे,संतोष गुंजाळ,मिठू भिसे, बाळासाहेब ढाकणे, गोरख खेडकर, मारुती अभंग, त्रिंबकराव कंठाळे यांच्यासह परिसरातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रामनाथ खेडकर यांनी आभार मानले.

## पाथर्डी येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात क्रीडा महोत्सव उत्साहात



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी शहर :** पार्थर्डी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व पाथर्डी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त बाबुजी आव्हाड महाविद्यालयात 'क्रीडा महोत्सव २०२६' चे अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात आयोजन करण्यात आले. नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या शुभहस्ते या क्रीडा महोत्सवाचे दिमाखदार उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विजय देशमुख, प्रा. सचिन शिरसाट, डॉ. अशोक कानडे, प्रा. दत्तप्रसाद पालवे, डॉ. प्रशांत साळवे आणि डॉ. अरुण राख, डॉ किरण गुलदगड आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणकौशल्यांना वाव मिळावा, त्यांच्यामध्ये क्रीडा संस्कृती रुजावी आणि निकोप स्पर्धात्मकतेसोबतच शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहावे, या मुख्य उद्देशाने या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

# किराणा दरवाढीने श्रीगोंद्यात गृहिणींचे बजेट कोलमडले!

## 'लाडकी बहीण'चे १,५०० रूपये येतात, पण किराण्याच्या पिशवीतच जातात...

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** महिन्याच्या सुरुवातीलाच घरखर्चाचे नियोजन करणाऱ्या गृहिणींसमोर आता किराणा बाजाराने नवे संकट उभे केले आहे. साखर, डाळी, खाद्यतेल, कांदा, लसूण, शेंगदाणे यांसह अनेक जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या दरामुळे श्रीगोंद्यातील सर्वसामान्य कुटुंबांचे मासिक बजेट अक्षरशः कोलमडले आहे. सरकारकडून महिलांच्या खात्यावर येणाऱ्या मदतीमुळे काहीसा दिलासा मिळत असला, तरी बाजारात गेल्यानंतर वाढलेल्या किराणा बिलामुळे 'मदत किती आणि खर्च किती?' हा प्रश्न गृहिणींसमोर उभा ठाकला आहे.सध्या राज्यात साखरेच्या दरवाढीची जोरदार चर्चा सुरू आहे. त्याचबरोबर कांदा, डाळी आणि खाद्यतेलाच्या दरातही चढ-उतार सुरू असल्याने त्याचा थेट परिणाम घरगुती अर्थकारणावर होत आहे. अलीकडील बाजार अहवालांमध्ये साखरेचा दर वाढल्याचे तसेच कांद्याच्या दरात मोठी उसळी आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

**महिन्याचा किराणा; पिशवी छोटी, बिल मोठे!**

पूर्वी महिन्याचा किराणा एकदाच भरून ठेवला की घरखर्चाचे गणित काही प्रमाणात नियंत्रणात राहत होते. आता मात्र प्रत्येक वस्तू घेताना गृहिणींना दोनदा विचार करावा लागत आहे. डाळी महाग, तेल महाग, साखर महाग आणि भाजीपाल्याचे दरही स्थिर नसल्याने महिन्याचा खर्च कसा भागवायचा, असा प्रश्न अनेक कुटुंबांना पडला आहे.'पूर्वी हजार रुपयांत जी पिशवी भरायची, त्याच वस्तूंसाठी आता अधिक पैसे मोजावे लागतात. वस्तू कमी घेतल्या तरी बिल कमी होत नाही,' अशी भावना ग्राहकांमधून व्यक्त होत आहे.

**साखरेचा गोडवा झाला कडू!**

चहापासून गोड पदार्थांपर्यंत प्रत्येक घरात वापरली जाणारी साखर महागल्याने त्याचा थेट परिणाम स्वयंपाकघरावर झाला आहे. अलीकडच्या अहवालांनुसार देशातील काही बाजारपेठांमध्ये साखरेच्या किरकोळ दरात मोठी वाढ झाली आहे. साखरेच्या दरवाढीबरोबरच डाळींच्या किमतीही ग्राहकांच्या चिंतेत भर घालत आहेत.

**'लाडकी बहीण'च्या पैशांचेही गणित बिघडले**

महिलांच्या खात्यावर दरमहा मिळणाऱ्या १,५००च्या मदतीकडे अनेक कुटुंबे आधार म्हणून पाहतात. मात्र वाढत्या घरखर्चामुळे ही रक्कम हातात पडताच किराणा, भाजीपाला, गॅस, औषधे आणि इतर दैनंदिन खर्चात संपून जाते.'एका हाताने सरकार पैसे देते; दुसऱ्या हाताने महागाई ते पैसे घेऊन जाते,' अशी भावना महिलांमध्ये व्यक्त होत आहे. त्यामुळे केवळ आर्थिक मदत पुरेशी नसून जीवनावश्यक वस्तूंच्या किमती नियंत्रणात ठेवणे गरजेचे असल्याचे महिलांचे म्हणणे आहे.

**कांदा-लसणानेही डोळ्यात पाणी**

साखरेनंतर कांद्याच्या दरवाढीनेही ग्राहकांना धक्का दिला आहे. अलीकडील अहवालानुसार काही बाजारपेठांमध्ये कांद्याचे दर महिनाभरात मोठ्या प्रमाणात वाढले असून लसणाच्या दरानेही २००चा टप्पा ओलांडल्याचे वृत्त आहे. वाढत्या दरावर नियंत्रण आणण्यासाठी केंद्राकडून स्वस्त दरात कांदा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.श्रीगोंद्यातही किरकोळ बाजारातील दरवाढीचा फटका ग्राहकांना बसत असून, 'कांदा रोजचा; पण भाव रोज नवा' अशी परिस्थिती असल्याची चर्चा ग्राहकांमध्ये आहे.

**महागाईवर नियंत्रणाची मागणी**

किराणा वस्तूंच्या वाढत्या दरामुळे सर्वाधिक फटका मध्यमवर्गीय आणि अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांना बसत आहे. केंद्राच्या किंमत निरीक्षण प्रणालीमध्ये देशभरातील जीवनावश्यक वस्तूंच्या दरांची नोंद केली जाते. मात्र स्थानिक पातळीवर किरकोळ विक्रीतील दरवाढीवर प्रशासनाने लक्ष ठेवून साठेबाजी अथवा अनावश्यक दरवाढ होत आहे का, याची तपासणी करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

**श्रीगोंद्यातील गृहिणींचे स्पष्ट म्हणणे आहे-'मदत मिळतेय, पण महागाई कमी झाली तरच खरा दिलासा मिळेल!'**

महिन्याच्या बजेटमध्ये आधी किराणा, नंतर इतर गरजा आणि शेवटी बचत, असे गणित असायचे. आता परिस्थिती उलटी झाली आहे. किराणा भागवताना बचत तर दूरच; अनेक कुटुंबांना पुढील महिन्याचा खर्च कसा भागवायचा, याचा विचार करावा लागत आहे.महागाईचा हा आलेख असाच चढत राहिला, तर 'लाडकी बहीण'च्या मदतीपेक्षा बाजारभावाचा आकडा मोठा ठरणार, अशीच श्रीगोंद्यातील गृहिणींची व्यथा आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

गुरुवार दि.२७ ऑगस्ट २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## सावरगावतळला बंद घर फोडून सव्वा लाखांचे दागिने लंपास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील सावरगाव तळ येथे बंद घराचे कुलूप उघडून अज्ञात चोरट्याने सुमारे १ लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना सोमवारी घडली. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. अर्जुन मनाजी नेहे (वय ५२) हे पत्नीसमवेत राहतात. सोमवारी सकाळी ११.४५ वाजता दाम्पत्य पाहुण्यांना भेटण्यासाठी कांहडळ वाडी ता सिन्नर येथे गेले होते बाहेर . सायंकाळी घरी परतल्यानंतर किचन दरवाजाचे कुलूप उघडे असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले . त्यांनी घराची पाहणी केली असता कपाटा तील सुमारे १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे झुबे आणि सोन्याची पोत व इतर दागिने, असा एकूण १ लाख २० हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेल्याचे निदर्शनास आले.चोरट्याने घरातील साहित्याची उचकापाचक करून दागिने लंपास केले. याबाबतचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक विकास काळे हें करीत आहेत.

# चिमुकल्याला पकडणारा बिबट्या अखेर जेरबंद !

## चार दिवस पिंजऱ्याला हुलकावणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अकोले** : तालुक्यातील कुंभेफळ येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकल्यावर हल्ला करून त्याला जबड्यात पकडत उसाच्या शेतात ओढून नेणारा बलाढ्य नर बिबट्या अखेर मंगळवारी सायंकाळी वनविभागाच्या पिंजऱ्यात जेरबंद झाला. गेल्या चार दिवसांपासून बिबट्या पिंजऱ्यांना हुलकावणी देत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण होते.



कुंभेफळ-तांभोळ रस्त्यालगत कोटकर वस्तीवर शुक्रवारी (दि.२१) सायंकाळी ही घटना घडली. अंकुर कोटकर हा आपल्या बहिणीसोबत घराजवळ खेळत असताना उसातून अचानक आलेल्या बिबट्याने त्याच्यावर झडप घालून त्याला जबड्यात पकडले व उसाच्या शेतात नेले. आजोबा अशोक कोटकर यांनी धाडसाने बिबट्याचा पाठलाग करून आरडाओरडा केला.

त्यामुळे बिबट्याने अंकुरला सोडून पलायन केले. हल्ल्यात अंकुरच्या मानेवर गंभीर दुखापत झाली असून संगमनेर येथील खासगी रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती स्थिर असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. दरम्यान, वनविभागाने परिसरात पाच पिंजरे लावून शोधमोहीम सुरू केली. बिबट्याचा ठावठिकाणा शोधण्यासाठी ड्रोनचीही मदत घेण्यात आली. याच काळात शेजारील शेतात घास कापणाऱ्या संगीता पांडे यांच्यावरही बिबट्याने झडप मारण्याचा प्रयत्न केला होता.

चार दिवसांच्या अथक प्रयत्नांनंतर अखेर बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. वनविभागाच्या पथकाने केलेल्या कारवाईबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## घरमालकाची नजर चुकवून नोकराने केला १.३२ लाखांचा ऐवज लंपास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : शहरातील फुलेवाडी रोड परिसरात घरमालकाच्या घरातून १ लाख २० हजार रुपयांची रोकड आणि सोन्याच्या दोन अंगठ्या असा एकूण सुमारे १ लाख ३२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याप्रकरणी रामललित यादव (रा. उत्तर प्रदेश) याच्याविरुद्ध बुधवारी वैजापूर पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अरविंद अग्रहरी हे फरशी बसविण्याचे ठेकेदारी काम करतात. रामललित यादव हा मागील चार वर्षांपासून त्यांच्या घरी काम करीत होता. २७ जुलै रोजी अग्रहरी यांच्या पत्नी गुडिया घरी असताना यादव तेथे आला.

'शेठशी माझे बोलणे झाले आहे. मला दवाखान्यात जायचे आहे, पैसे द्या,' असे त्याने गुडिया यांना सांगितले.

दरम्यान, पाऊस सुरू झाल्याने गुडिया छतावर वाळत टाकलेले कपडे आणण्यासाठी घराबाहेर गेल्या. ही संधी साधून यादव याने घरातील लाकडी ड्रॉव्हर उघडून त्यातील १ लाख २० हजार रुपयांची रोकड तसेच सोन्याच्या दोन अंगठ्या चोरल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

गुडिया घरात परतल्यानंतर ड्रॉव्हरमधील रोकड व सोन्याच्या अंगठ्या गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

त्यानंतर अरविंद अग्रहरी यांनी वैजापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी रामललित यादव याच्याविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदविला असून, पुढील तपास वैजापूर पोलिस करीत आहेत.

## वाळूच्या ढंपरचा पाठलाग; चालकाची उडी, विनाक्रमांकाचा ढंपर ताब्यात

### देवळाली प्रवरा पालिकेच्या वीजपुरवठ्याचा पोल उद्ध्वस्त



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : नगर-मनमाड महामार्गावर विनाक्रमांकाचा ढंपर वाळू भरून जात असताना राहुरी महसूल पथकाने त्याचा पाठलाग सुरू केला. महसूल पथक मागावर असल्याचे लक्षात येताच चालकाने ढंपर महामार्गावरून थेट कारखाना रस्त्याकडे वळवला. काही अंतर जाताच चालकाने चालत्या ढंपरमधून उडी मारून पोबारा केला. मात्र, चालकाविना सुसाट धावणारा ढंपर देवळाली प्रवरा नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला एक्स्प्रेस फिडरद्वारे वीजपुरवठा करणाऱ्या विद्युत पोलवर जाऊन धडकला. ही थरारक घटना बुधवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली. ढंपरला अपघात झाल्यानंतर महसूल पथकाने तो ताब्यात घेतला. घटनेची माहिती मिळताच देवळाली प्रवरा नगरपालिकेचे अधिकारी, मंडलाधिकारी अभिजित खटावकर, तलाठी गणेश गर्कळ तसेच पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. विनाक्रमांकाचा हा ढंपर वाळू वाहतूक करत असल्याने त्याच्यावर महसूल विभागाकडून कोणती कारवाई केली जाते, तसेच चालकाचा शोध कधी लागतो, याकडे आता लक्ष लागले आहे. वाळू तस्करीचा पाठलाग थेट पालिकेच्या वीजपोलवर! या घटनेमुळे अवैध वाळू वाहतुकीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, विनाक्रमांकाचा ढंपर रस्त्यावरून धावत असताना त्याच्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या यंत्रणेसमोरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## ड्रग्ज इन्स्पेक्टर भरती परीक्षा रद्द

### पेपर लीक प्रकरणाने MPSC मध्ये खळबळ
### मुंबई क्राइम ब्रँचकडून तपास सुरू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई** : नीटसह विविध स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटीच्या घटनांमुळे देशभरात चिंता व्यक्त होत असतानाच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (MPSC) ड्रग्ज इन्स्पेक्टर ग्रुप 'बी' पदासाठी आयोजित केलेली परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. फूड अँड ड्रग्ज विभागातील या भरती परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत अनियमितता आणि पेपर लीक झाल्याचे आरोप झाल्यानंतर मुंबई क्राइम ब्रँचकडून या प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला होता.

तपासात परीक्षा सुरू होण्यापूर्वीच एका विद्यार्थ्यापर्यंत प्रश्नसंच पोहोचल्याची माहिती समोर आल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे. लफूड अँड ड्रग्ज विभागातील ड्रग्ज इन्स्पेक्टर ग्रुप 'बी' पदासाठी ही परीक्षा घेण्यात आली होती. परीक्षा प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याचा आरोप झाल्यानंतर संबंधित यंत्रणांकडून त्याची गांभीर्याने दखल घेण्यात आली. पेपरफुटीच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी मुंबई क्राइम ब्रँचकडे तपास सोपविण्यात आला. प्राथमिक तपासादरम्यान परीक्षा सुरू होण्यापूर्वीच एका विद्यार्थ्याच्या हाती परीक्षेचा प्रश्नसंच पोहोचल्याचे समोर आल्याचे सांगण्यात येत आहे. परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने अखेर ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयामुळे परीक्षेला बसलेल्या उमेदवारांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. मेहनत करून परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये आणि भरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडावी, अशी उमेदवारांची अपेक्षा आहे.

दरम्यान, नीट परीक्षेच्या पेपरफुटीच्या प्रकरणानंतर देशभरात स्पर्धा परीक्षांच्या सुरक्षिततेचा आणि पारदर्शकतेचा मुद्दा चर्चेत आला होता. त्याच पार्श्वभूमीवर MPSCच्या या निर्णयाकडेही गांभीर्याने पाहिले जात आहे. पेपर लीक प्रकरणाच्या तपासातून आणखी कोणते धक्कादायक खुलासे समोर येतात आणि संबंधितांवर कोणती कारवाई होते, याकडे आता उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

## अवैध धंद्यांचे 'पुरावे' सोशल मीडियावर

### पोलिसांवर शिंतोडे, कारवाईवर प्रश्नचिन्ह!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**श्रीगोंदा** : तालुक्यात सुरू असल्याचा आरोप होत असलेल्या अवैध धंद्यांचा मुद्दा आता सोशल मीडियावर चांगलाच तापला आहे. विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर काही नागरिकांकडून कथित अवैध धंद्यांचे फोटो, व्हिडिओ तसेच ठिकाणांची माहिती शेअर करून संबंधितांवर कारवाईची मागणी केली जात आहे. या पोस्टमधून थेट पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित केले जात असल्याने पोलीस प्रशासनाची भूमिका चर्चेचा विषय बनली आहे. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर अवैध दारूविक्री, मटका, जुगार तसेच इतर कथित अवैध व्यवसायांबाबत विविध पोस्ट प्रसारित होत आहेत. काही पोस्टमध्ये ठिकाणांचे फोटो-व्हिडिओ असल्याचे सांगितले जात असून, संबंधित यंत्रणेला कारवाई करण्याचे आवाहन केले जात आहे. त्यामुळे 'सोशल मीडियावर पुरावे दिसत असताना प्रत्यक्ष कारवाई कुठे?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, सोशल मीडियावरील प्रत्येक पोस्ट अथवा व्हिडिओ हा अधिकृत पुरावा मानता येत नाही. त्याची सत्यता, तारीख, ठिकाण आणि पार्श्वभूमी यांची स्वतंत्र पडताळणी होणे आवश्यक आहे. मात्र, एखाद्या पोस्टमध्ये ठोस माहिती किंवा पडताळता येण्याजोगे पुरावे असल्यास संबंधित यंत्रणेने त्याची दखल घेऊन चौकशी करणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने सोशल मीडियावर होत असलेल्या आरोपांची गंभीर दखल घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची गरज निर्माण झाली आहे. संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष तपासणी, गुप्त माहितीच्या आधारे कारवाई आणि अवैध धंदे आढळल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. विशेष म्हणजे, काही प्रकरणांमध्ये पोलिसांनी अवैध धंद्यांविरोधात कारवाई केल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे सोशल मीडियावरील आरोप आणि प्रत्यक्ष पोलीस कारवाई यातील वस्तुस्थिती काय, याबाबतही स्पष्टता होणे आवश्यक आहे.

### आरोप गंभीर; आता उत्तरदायित्वाची वेळ

अवैध धंद्यांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असेल तर त्यावर तातडीने कारवाई होणे गरजेचे आहे. दुसरीकडे, पोलिसांवर केले जाणारे आरोपही पुराव्यांच्या आधारेच तपासले जाणे आवश्यक आहे. त्यामुळे सोशल मीडियावरील पोस्टच्या आधारे निष्कर्ष काढण्याऐवजी पोलीस प्रशासनाने या आरोपांची चौकशी करून सत्य जनतेसमोर आणणे महत्त्वाचे ठरणार आहे.'अवैध धंदे असतील तर कारवाई करा आणि आरोप खोटे असतील तर सत्य स्पष्ट करा', अशी अपेक्षा आता श्रीगोंदा तालुक्यातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

ऐसा जन्म लाभावा
देहाचा चंदन व्हावा !
आयुष्य संपले तरी
सुगंध दरवळत रहावा !!

स्व. अॅड. पोपटराव बबनराव पटारे
यांना
भावपूर्ण श्रद्धांजली



दशक्रिया विधी - गुरूवार दि. २७/०८/२०२६ रोजी सकाळी ८:३० वा. अमरधाम कारेगाव, ता. श्रीरामपूर येथे होईल.
तेरावा - रविवार दि. ३०/०८/२०२६ रोजी सकाळी १०:३० वा. पटारे वस्ती, कारेगाव-खोकर रोड, कारेगाव, ता. श्रीरामपूर येथे होईल.

स्वर्गवास दि. १८/०८/२०२६

-प्रवचन सेवा-
विश्वगुरू सन्मानित ह.भ.प.
नामदेव महाराज हरड
(मुरबाड, मुंबई)
यांचे सकाळी ८ वा. प्रवचन होईल.



दुःखांकित
गं.भा. सुमनबाई बबनराव पटारे (आई)
गं.भा. शिला पोपटराव पटारे (पत्नी)
सौ. सुरेखा अशोकराव दंडवते (बहीण)
सौ. सुजाता पंढरीनाथ शिंदे (बहीण)
सौ. शितल बाळासाहेब कदम (बहीण)
सौ. नंदा सुरेशराव सोनवणे (बहीण)
सौ. शोभा शंकरराव दहातोंडे (बहीण)
सौ. श्वेता रोहित नांगरेपाटील (मुलगी)
सौ. धनश्री विक्रम काळे (मुलगी)
कु.शरयु पोपटराव पटारे (मुलगी)
सौ. सोनाली संदिप मोडके (पुतणी)
सौ. अनुजा आकाश वाकडे (पुतणी)
श्री. सुभाष बबनराव पटारे (भाऊ)
श्री. बाबासाहेब नारायण पटारे (भाऊ)
श्री. अशोकराव दत्तात्रय दंडवते (मेव्हणे)
श्री. पंढरीनाथ रंगनाथ शिंदे (मेव्हणे)
श्री. बाळासाहेब नानासाहेब कदम (मेव्हणे)
श्री. सुरेशराव जगन्नाथ सोनवणे (मेव्हणे)
श्री. शंकरराव नामदेव दहातोंडे (मेव्हणे)
श्री. रोहित मनोहर नांगरे पाटील (जावई)
श्री. विक्रम चिंतामण काळे (जावई)
श्री. संदिप झुंबरशेठ मोडके (जावई)
श्री. आकाश अरूण वाकडे (जावई)
चि. अर्जुन सुभाष पटारे (पुतण्या)
चि. निमेश सुनिल पटारे (पुतण्या)
चि. करण सुभाष पटारे (पुतण्या)
समस्त पटारे परिवार
व नातेवाईक



स्व.अॅड.पोपटराव बबनराव पा.पटारे यांना भावपुर्ण श्रद्धांजली...
* शोकाकुल *
श्री.अर्जुन पाटीलबा पा.म्हसे
(निवृत्त आय.एफ.एस)
लोकनियुक्त सरपंच, कोंढवड, ता.राहुरी
डॉ.श्री.योगेश पाटीलबा पा.म्हसे
(निवृत्त आय.ए.एस.)
मा.सचिव मंत्रालय
श्री.साहेबराव पाटीलबा पा.म्हसे
(मा.उपाध्यक्ष मार्केट कमिटी, राहुरी)
सौ.स्वाती योगेश पा.म्हसे
(आय.ए.एस.)सचिव, प्रशासन मंत्रालय, मुंबई
समस्त म्हसे पा.परिवार, कोंढवड, ता.राहुरी



स्व.अॅड.पोपटराव बबनराव पा.पटारे
यांना भावपुर्ण श्रद्धांजली...
कारेगाव प्रगत बासगायतदार
विविध कार्यकारी सेवा संस्था
कारेगांव, ता.श्रीरामपूर
श्री.बाबासाहेब नारायण पटारे — चेअरमन
श्री.ज्ञानेश्वर काशीनाथ वाळुंज — व्हा.चेअरमन
श्री.शंकर आप्पाजी जाधव
श्री.कैलास जगन्नाथ खामकर
श्री.रामभाऊ भाऊराव कोठाळे
श्री.कैलास कारभारी पवार
सौ.विद्या उमेश रोहकले
सौ.सुरेखा सतिश पटारे
सौ.सुशिला नानासाहेब पटारे
सौ.कावेरी विलास कडु
श्रीम.शिला पोपटराव पटारे
श्री.महादेव एकनाथ धायतडक
सचिव - जगन्नाथ बबनराव नरसाळे

श्री.सचिनदादा गोविंद दांडगे
(उद्योजक, मुंबई) संचालक कारेगाव सोसायटी
श्री.सचिनदादा दांडगे मित्र मंडळ
कारेगाव, ता.श्रीरामपूर

श्री.दिपक शिवराम पा.पटारे
मा.सभापती पं.समिती, श्रीरामपूर

श्री.सुनिल गंगाधर पा.पटारे
सदस्य - ग्रामपंचायत कारेगाव, ता.श्रीरामपूर

श्री.प्रणव अशोक भारत
सदस्य - ग्रामपंचायत कारेगाव, ता.श्रीरामपूर

श्री.भाऊसाहेब धोंडीराम उंडे
संचालक - अशोक सह साखर कारखाना, ता.श्रीरामपूर

कारेगाव विविध कार्यकारी सेवा संस्था, कारेगाव
श्री.सतिश किसन पटारे — चेअरमन
सचिव-भाऊसाहेब तऱ्हाळ व संचालक मंडळ
श्रीम.मंगल राजेंद्र उंडे — व्हा.चेअरमन

साई श्रद्धा व्हेजिटेबल
श्री.सुनिल आण्णा भवार, मार्केट यार्ड, ता.श्रीरामपूर

जय भवानी दुध संकलन व शितकरण केंद्र
व वेदांत कृषि सेवा केंद्र.कारेगाव
साई एन्टरप्राइजेस, श्रीरामपूर
प्रोप्रा. ऋतिक अनिलराव कहांडळ

सुमित दुध संकलन व शितकरण केंद्र कारेगाव
प्रो.सुमित रमेश पटारे, कारेगाव

श्री.पंढरीनाथ रंगनाथ शिंदे
सौ.सुजाता पंढरीनाथ शिंदे, पुणे

छत्रपती अर्थमुव्हर्स अॅण्ड सप्लायर्स
प्रो.प्रा.सुभाष आप्पासाहेब पटारे, कारेगाव

जाहिरात संकलन - पत्रकार श्री.अर्जुन बी.राऊत, टाकळीभान, ८३७९८१००१८